२९

T. ग्रं. सं. ठाणे
चरित्र
२०८

# मुरार बाजी देशपांडे

## याचें चरित्र.

लेखकः—

REFBK-0003874

कृष्ण सखाराम कुळकर्णी.

मुद्रकः—यशवंत काशिनाथ पडवळ, तत्त्वविवेचक प्रेस,
भायखळा, परेलरोड, मुंबई नं. ८

प्रकाशकः—बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी, कवळीची चाळ,
कुंभारवाडा, दादर, मुंबई नं. १४.

# सरदार
# मुरार बाजी देशपांडे
## यांचें चरित्र.

—:०:—

पुस्तक ७ वें

REFBK-0003874

बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी,
कवळीची चाळ, कुंभारवाडा, दादर, मुंबई नं. १४.

सन १९२९

—:०:—

किंमत ८ आणे

# प्रस्तावना.

नमो जन्मभूमी जिथें जन्मलों मी ॥ नमो कर्मभूमी जिथें वाढलों मी ॥
महाराष्ट्र देशा तुझ्या नित्य कामीं ॥ झिजो देह माझा असें प्रार्थितों मी ॥

श्री. बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी यांनीं 'सरदार मुरार बाजी देशपांडे यांचें चरित्र' लिहिलें आहे. त्यास मीं प्रस्तावना लिहून द्यावी अशी मला त्यांनीं विचारणा केली तेव्हां मी मोठ्या बुचकळ्यांत पडलों. कारण मी कसलेला लेखक नाहीं. इतिहास हा माझ्या अध्ययनाचा विषय नाहीं. वाङ्मयसंसारांत माझी गणती सेवकांमध्यें सुद्धां होणें कठीण. केवळ एक सहानुभूतिपूर्ण प्रेक्षक व श्रद्धापूर्ण उपासक हीच सरस्वती देवीचे मंदिरांत फार तर माझी भूमिका होऊं शकेल.

अशा परिस्थितींत मी प्रस्तावना लिहिण्याचें साहस करावें काय ? व मला प्रस्तावना लिहिण्यास सांगतांना ग्रंथलेखकानें कोणता हेतु साध्य करण्याचें योजिलें असावें ? हे दोन प्रश्न सहजच मजसमोर उभे राहिले. पहिल्या प्रश्नाचें उत्तर होकारार्थी देऊनच मी या लेखाचा उपक्रम केला आहे. हें साहस तर खरेंच. परंतु ज्या अर्थी मला विचारलें आहे त्या अर्थी नाहीं म्हणणें योग्य होणार नाहीं असें वाटलें. शिवाय चरित्रनायक "चांद्रसेनीय कायस्थ प्रभु" ज्ञातींतील एक रणशूर योद्धा, चरित्रलेखकहि "चांद्रसेनीय कायस्थ प्रभु" ज्ञातींतील एक कसलेला लेखक. मी सुद्धां "चांद्रसेनीय कायस्थ प्रभु" ज्ञातींतील एक घटक. तेव्हां अनायासें प्राप्त झालेली ही ज्ञातिसमाजाच्या सेवेची संधि व्यर्थ कां जाऊं द्यावी या विचारानेंहि मला हें साहस करण्यास प्रवृत्त केलें. लेखकानें विचारणा करतांना कोणताहि हेतु मनांत योजिलेला असो, माझें साहस या वरील केवळ पोकळ दिसणाऱ्या विचारांनींच होत आहे हें सकृद्दर्शनीं वाचकांस कळविणेंच इष्ट होय.

श्री. कुळकर्णी यांनीं या पूर्वीं अशींच दोन चरित्रें लिहून महाराष्ट्रीय वाचकवृंदासमोर ठेविलीं आहेत. प्रस्तुतचें चरित्र त्यांनीं संकल्पिलेल्या चरित्रमालेंतील तिसरें पुष्प होय. पहिलीं दोन पुष्पें लोकमान्यता व राजमान्यता पावलीं आहेतच. हें तिसरेंहि त्याचप्रमाणें लोकमान्य व राजमान्य होईल याबद्दल शंकाच नको. चरित्रनायक पहिल्या दोन नायकांपेक्षां कदाचित् सरस नसला तरी त्यांच्यापेक्षां रेसमात्रहि उणा नव्हता, याबद्दल कोठेंहि दुमत होणार नाहीं. एक प्रतीचा लढवय्या, अत्यंत विश्वासू, अंगीकारिलेलें कार्य शेवटास नेतांना मागेंपुढें न पाहणारा, स्वधर्मप्रेमानें देहभान विसरलेला, स्वदेशभक्तीनें कार्यप्रवृत्त झालेला, स्वाभिमानानें रसरसलेला व स्वातंत्र्यप्रीतीनें रंगलेला हा नरवीर पूर्वींच्या दोन चरित्रनायकांप्रमाणेंच " हिंदवी स्वराज्या " चा पाया भरण्याच्या कामीं उपयोगास आला. इ. स. १६४६ पासून इ. स. १६६६ पर्यंत " हिंदवी स्वराज्याच्या " पायाची भरणी चालू होती. त्या भरणींत अनेक दगड ठेंचून भरावे लागले. पायाच्या मजबुतीवरच इमारतीची उभारणी व शाश्वति अवलंबून असते. अर्थात् पायांत जर कच्चे दगड, माती वगैरे भरण्यांत आली तर इमारत बांधणेंच कठीण जातें. कशीबशी बांधावी तों तिला तडा पडतात व थोड्याच अवधींत ती कोसळते व जमीन-दोस्त होते. महाराष्ट्रांत "हिंदवी स्वराज्या"ची इमारत बांधण्यांत आली ती दीडशें वर्षें टिकली. आणि तिला आंतूनच पोंखरण्याची दुष्ट कृति जर तिच्यांत वास्तव्य करणाऱ्या नराधमांनीं केली नसती तर ती आणखीहि कित्येक वर्षें तशीच टिकती. त्या इमारतीवर बाहेरचा हल्ला कितीहि निकराचा झाला असता तरी ती किंचिन्मात्र कलली नसती. पानिपतचा घोर प्रसंगच हें पटवून देतो. त्या हल्ल्यांतून ती पार पडते, सुखरूप राहते, नव्हे पुनः पराक्रमशाली होते व पूर्व वैभवाची स्मृति जागृत करते. परंतु तीच पुढील ५०।६० वर्षांत तिला आंतून खणण्यास

प्रारंभ होतांच डळमळीत झाली व परिणामीं कोलमडून पडली आणि नामशेष झाली. आज "हिंदवी स्वराज्य" हा अक्षरसमुच्चय मात्र डोळ्यांना दिसतो. परंतु त्या षडक्षरी मंत्रांत चैतन्य नाहीं. त्यांत हृदयाला हलवून सोडण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं. तीं निर्जीव अर्थशून्य आकारधारी अक्षरें आहेत. त्यांच्यांतील अंतःस्थित चैतन्य कधीं पुनरूर्जित होणार कोण जाणे! त्यांतील मंत्रबीज शक्तिरूपानें प्रादुर्भूत होऊन हिंदवी हृदयास प्रेमाचें, सामर्थ्याचें व कर्तव्यपरायणतेचें भरतें केव्हां आणणार! प्रस्तुत लेखक आशावादी आहे. इतिहासाची पुनरावृत्ति होणारच हा त्यास भरंवसा वाटतो. "हिंदवी स्वराज्या"ची इमारत कोसळली, जमीनदोस्त झाली तरी तिचा पाया अद्यापिहि तसाच मजबूत व स्थिर आहे. त्यांत कोठेंहि न्यूनता आलेली नाहीं अशी त्याची श्रद्धा आहे. कारण त्याला जाणीव आहे कीं, त्या पायाची भरणी करतांना जे दगड व जो चुना उपयोगांत आणिला गेला ते दगड व तो चुना असा तसा नव्हता. त्या दगडांची खाण स्वदेशभक्ति ही होती. स्वदेशभक्तीनें वेडे झालेले शूर वीर नरमणि यांच्या देहांनीं तो पाया भरला आहे. त्यांच्या रक्ताचें मिश्रण त्यांत घालून त्यांच्या अस्थींच्या चुन्यानें तो पाया मजबूत व शाश्वत करण्यांत आला आहे. असे दगड, असें मिश्रण व असा चुना जेथें वापरण्यांत आला आहे तो पाया चिरंतन राहील, तो शुद्ध राहील, त्याच्यावर कुशल शिल्पकाराला वाटेल तेव्हां सुंदर बांधकाम करतां येईल यांत काय संशय! त्या पायांत जे नानाविध दगड ठेंचून ठेंचून भरले गेले त्यांतीलच एक दगड सरदार मुरार बाजी देशपांडे होत. त्यांचें चरित्र महाराष्ट्रीय रसिक वाचक वर्गासमोर ठेवण्यांत श्री. कुळकर्णी यांनीं समयोचितता तर दाखविलीच आहे, पण त्यांतल्या त्यांत सद्यःकालांत जी उदासीनता निदर्शनास येते, "मला काय त्याचें" या षडक्षरी जपाचा जो घोष चालू आहे त्यास चांगलाच धक्का देण्याचीहि कामगिरी त्यांनीं केली असें प्रस्तुत लेखकास वाटत आहे.

मुरार बाजी सारखीं सुंदर घोंसदार कणसें ज्या भूमींत निर्माण होतात, ती भूमि कितीहि पडित झाली, निकस झाली, कासतणानें आच्छादली गेली, तरी पण तिच्यांत योग्य काळीं योग्य बीजारोपण झाल्यास सुंदर सुंदर भरीव कणसेंहि उपजतील यांत शंका नको. प्रस्तुत चरित्रासारख्या कथानकानें त्या भूमीची नांगरणी होत असते. प्राक्कालीन इतिहास वृथाभिमानानें दुसऱ्यास श्रुत करावयाचा नसतो, तर आत्मविश्वासानें त्याचें अध्ययन करावयाचें असतें. त्या अध्ययनानें अंगीं स्वाभिमान, स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान बाणतात. आणि या त्रयीचा अंगांत संचार झाला, कीं परवशतेचें मानगुटीस बसलेलें भूत तत्काळ पळ काढतें. परवशता—बाह्य परवशता—शारीरिक परवशता—विशेष जाचक नसते. तीपासून फारशी हानि होत नाहीं. आर्थिक परवशता त्याहून अधिक जाचक होते. कारण त्या योगें शारीरिक परवशता दूर करण्याचें सामर्थ्य अधें अधिक नष्ट होतें. परंतु या सर्वांहून बिकट, भयंकर हानि करणारी परवशता मानसिक परवशता होय. या परवशतेनें एकदां गळ्याभोंवतीं मिठी मारली, कीं मग ती मगरमिठीच होय. तें काळसर्पाचेंच वेटोळें होय. ती मिठी सोडवायला विलक्षण सामर्थ्य—अंत:स्फूर्त सामर्थ्य लागतें. तें वेटोळें जबरदस्त मांत्रिकच सोडवूं शकतो. मानसिक दास्य घर करून बसलें, कीं त्याचे भाऊबंद सर्वच सपरिवार येऊन ठाणें देतात. शारीरिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक सर्व प्रकारें परावलंबन करणें सुलभ जातें, सुखावह वाटतें व दिवसें दिवस त्यांचे मऊमऊ पाश अधिकाधिक बळकट होत जातात. म्हणून परवश जनतेला जर प्रथमत: कांहीं करावयाचें असेल तर तें हें कीं हें मानसिक दास्य—आत्मिक दास्य—झुगारून दिलें पाहिजे. त्यासाठीं त्याच्या ठायीं स्वाभिमान जागृत झाला पाहिजे, स्वदेशाभिमान स्फुरण पावला पाहिजे, स्वधर्माभिमान प्रज्वलित झाला पाहिजे. हें कार्य जेणेंकरून होईल तीच गोष्ट हिताची होय.

प्रस्तुत चरित्रानें ती गोष्ट थोड्या फार प्रमाणांत सिद्ध होण्यासारखी आहे. म्हणूनच या चरित्राचें महत्त्व विशेष आहे. आणि हें चरित्र कथन करून श्री. कुळकर्णी यांनीं एक मोलाची देशसेवा केली आहे.

या कथानकांत ऐतिहासिक सत्य आहे याबद्दल वादच नाहीं. वाद कदाचित् असेल तर तो शक तिथि वार तारीख माहे यासारख्या शुष्क गोष्टींचाच आहे. 'इतिहास संशोधन' हा ज्यांचा आवडीचा विषय त्यांस हा वाद प्रिय व त्यांनींच तो वाद घालावा व त्यासंबंधीं रणें माजवावीं. माझ्यासारख्या इतिहासानभिज्ञास त्यांत कांहींच स्वारस्य वाटत नाहीं. सामान्य जनताहि चरित्र वाचतांना त्यांतील तिथिवारांच्या अचूकतेकडे लक्ष्य देत नाहीं. कथानकांतील घटना वाचतांना त्यांच्या अंतःकरणांत ज्या भावना उद्भवतात त्यांच्या हेलकाव्यांनीं वर खालीं होणाऱ्या मनोदधींत ते गोते खात असतात. त्या वेळीं त्यांचें लक्ष चरित्रनायकावर आलेले दुर्धर प्रसंग व त्यांतून पार पडण्यासाठीं त्यानें चालविलेली धडपड या पलीकडे जात नाहीं.

सारांश, प्रस्तुत चरित्रांत लेखकानें ऐतिहासिक सत्यास न सोडण्याचा आपल्या परीं शक्य तो प्रयत्न केला आहे. मुख्यतः या नरवीर शिरोमणीच्या चरित्रापासून जो बोध घ्यावयाचा त्यास कोणत्याहि प्रकारें बाध येणें शक्य नाहीं. अत्यंत कठिण प्रसंग प्राप्त झाला असतां स्वकर्तव्याकडे किंचिन्मात्र दुर्लक्ष केलें, स्वदेशाभिमानास थोडें दूर सारिलें व स्वाभिमानाचें अल्पकाळ विस्मरण पडलें तर ऐहिक वैभव, प्रचलित राजमान्यता व विनाकष्टाचें शांतिमय सौख्यदायी जीवन सहज लाभणार, अशी परिस्थिति असतांहि जो पुरुष स्वकर्तव्यपरायण राहतो, स्वदेशाभिमान सोडीत नाहीं, स्वाभिमानास जागतो तो खरोखरीच धन्य होय. अशा धन्य नरश्रेष्ठांचीं चरित्रेंच सामान्य जनतेला स्फूर्तिदायक व सुविचारोत्पादक होतात. अशीं चरित्रें महाराष्ट्रानें "हिंदवी स्वराज्या" चा पाया घातला

त्या काळीं अनेकानेक होऊन गेलीं. तीं चरित्रें कथन करणें, श्रवण करणें, त्यांचें मनन करणें, त्यांचा अभ्यास करणें व त्यावरून आपल्या प्रस्तुतच्या जीवनचर्येंत योग्य तें स्थित्यंतर करणें हेंच प्रत्येक महाराष्ट्रीयाचें कर्तव्य होय. त्या कर्तव्याची जाणिव या चरित्राच्या वाचनानें होवो हीच प्रभुचरणीं प्रार्थना आहे.

शेवटीं या प्रस्तावनेनें लेखकास कोणत्याहि प्रकारचें साह्य होणार नाहीं ही जाणीव ठेवून, थोडीशी सरस्वतीची सेवा करण्याची संधि मला दिली याबद्दल त्यांचे आभार मानून, प्रत्येक महाराष्ट्रीय हृदय स्वदेश, स्वबंधु, स्वभाषा व स्वधर्म यांच्या प्रेमानें उचंबळो ही आशा बाळगून, हा लेख पुरा करतों.

शनिवार.
बलिप्रतिपदा शके १८५१
ता. २-११-१९२९.

**भाई कोतवाल.**

# निवेदन.

सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत अनेक वीरांनीं स्वराज्याकरितां व स्वधर्माकरितां आत्मबलिदान केलेलें आहे. त्यांचीं शक्य तीं चरित्रें प्रसिद्ध करावीं असा कांहीं वर्षांपूर्वीं संकल्प केला होता. पण परिस्थितीमुळें हें कार्य दिरंगाईवर पडूं लागलें. पण तशाहि अडचणींत पहिलें चरित्र—"मावळा सरदार–विश्वासराव नानाजी देशपांडे" व दुसरें चरित्र "वीर-रत्न–बाजीप्रभु देशपांडे" हीं दोन प्रसिद्ध केलीं. तीं लोकप्रिय तर झालींच, पण मुंबई इलाखा, मध्यप्रांत व वऱ्हाड येथील शिक्षण खात्यांनीं बक्षिसाकरितां व वाचनालयासाठीं मंजूर केलीं, त्याबद्दल मी सदरहू शिक्षणखात्यांचा फार आभारी आहें. व या मिळालेल्या प्रोत्साहनामुळें आतां हें तिसरें चरित्र–सरदार मुरार बाजी देशपांडे यांचें–वाचकांस सादर करीत आहें.

प्रस्तुत चरित्रास मुरार बाजीची किंवा त्याच्या पूर्वजांची अनुपलब्ध ऐतिहासिक माहिती अनेक प्रयत्न करूनहि मिळाली नाहीं, आणि म्हणून प्रसिद्ध झालेल्या अनेक ग्रंथांतील माहितीचा आधार घेऊन हें चरित्र लिहिलें आहे. त्यावरून पाहतां मुरार बाजीचे वडील प्रथम जावळीच्या मोऱ्याकडे होते. त्यांचा पराक्रम प्रत्यक्ष महंमद अदिलशहाच्या दृष्टोत्पत्तीस आल्यामुळें त्यानें त्यांस आपल्या दरबारीं नेलें, तेव्हां त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर मुरार बाजीस मोऱ्यानें आपल्या सरदारांत दाखल केलें. पुढें शिवाजीनें मोऱ्याचा उच्छेद केल्यावर मुरार बाजीस शिवाजीनें आपल्या

सरदारांत दाखल केलें. तेव्हांपासून मुरार बाजीचा संबंध मराठ्यांच्या राज्यांत जडला.

प्रस्तुत चरित्र लिहितांना ऐतिहासिक विवेचनपद्धति स्वीकारिली असल्यामुळें, मोऱ्यासंबंधीं माहिती, पुरंदरच्या किल्ल्याचें वर्णन व दिलेर-खानाबरोबर झालेला संग्राम हीं महत्वाची माहिती विवेचनपूर्वक दिलेली आहे व ही हकीकत महाराष्ट्राच्या इतिहासांत विशेष महत्वाची गणली गेली आहे.

स्वराज्य संपादन करण्याकरितां बाजीप्रभु देशपांडे, बाबाजी, बोवाजी, यशवंतराव बोवाजी, व तानाजी मालुसरे यांनीं एक एकाच प्रसंगीं पण आपल्या शौर्याची मात करून आत्मबलिदान केलें म्हणूनच मराठ्यांचें स्वराज्य महाराष्ट्राला लाभलें आणि म्हणूनच या वीरांचीं नांवें महाराष्ट्राच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिलीं गेलीं. त्याचप्रमाणें मुरार बाजीचा गौरव त्या वेळच्या रणक्षेत्रांत झाला. या कृत्याची सत्यता सर्व स्वकीय व परकीय इतिहासकारांनीं एकमुखानें वर्णिली आहे. त्याचप्रमाणें ज्या वीरांनीं आपलें शौर्य, वीर्य, तेज आदि-करून गुणांनीं आपली कीर्ति अजरामर करून ठेविली आहे, त्यांचीं चरित्रें लिहून उगवत्या तरुण पिढीनें स्मरण करून वाचावीं व या प्राचीन भारतभूमीची यशःश्रीपरंपरा चिरकाल रक्षण करावी हेंच मुख्य ध्येय आहे. यासच अनुसरून सुप्रसिद्ध इतिहासकार रा. रा. सरदेसाई म्हणतात— "दिलेरखानास 'दे माय धरणी ठाय' करण्यास लावणारा 'मुरार बाजी' व 'पुरंदर' हीं नांवें महाराष्ट्र विद्यार्थ्यांच्या मुखीं घोळत असलीं पाहि-जेत." (म. रि. ४७१). मुरार बाजीनें केवळ महाराष्ट्राच्या स्वातंत्र्या-

करितां आत्मबलिदान केलें, आणि म्हणूनच तो महाराष्ट्राच्या इतिहासांत ललामभूत झाला.

असो ! हें चरित्र लिहिण्यास ज्या ग्रंथांचे व लेखांचे आधार घेतले आहेत, त्यांची यादी सोबत दिलीच आहे. त्या ग्रंथकर्त्यांचे व लेखकांचे आम्ही आभारी आहोंत. त्याचप्रमाणें रा. रा. गणेश बळवंत नाडकर (सोलापूर) यांजकडून सदरहू घराण्याची विस्तृत वंशावळ व रा. रा. केशवराव सदाशिव कारखानीस (जामनगर) यांजकडून वंशावळ व ऐतिहासिक पत्रें (चरित्रनायकाच्या पुतण्यासंबंधीं) आलीं त्याबद्दल उभयतांचे आभार मानणें योग्यच आहे. तसेंच श्रीयुत अनंत महादेव उर्फ आण्णासाहेब चौबळ यांनीं सदरहू चरित्राची हस्तलिखित प्रत वाचून पाहिल्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें योग्य आहे.

त्याचप्रमाणें सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय वाङ्मयसेवक रा. रा. पुरुषोत्तम केशव उर्फ भाईसाहेब कोतवाल, यांनीं मोठ्या उत्सुकतेनें प्रस्तावना लिहिली त्याबद्दल रा. रा. भाईसाहेब यांचेहि आभार मानणें अत्यवश्य आहे.

असो ! मागील दोन्ही चरित्रांप्रमाणें हेंहि चरित्र लोकादरास पात्र होईल अशी आशा प्रदर्शित करून हें निवेदन संपवितों.

दादर,<br>
कार्तिक शु. ११<br>
शके १८५१

बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी.

प्रस्तुत चरित्र लिहितांना खालील ग्रंथ, वर्तमानपत्रें व मासिकें यांतून आधार घेतले आहेत.

---

१ श्री शिवछत्रपतीचें सप्तप्रकरणात्मक चरित्र—चिटणीस.

२ शिवछत्रपतीचें चरित्र—सभासद.

३ श्री शिवदिग्विजय.

४ प्रभुरत्नमाला.

५ मराठी रियासत ( पूर्वार्ध ).

६ मराठी दफ्तर ( १ ).

७ ज्ञानप्रकाश ता. २९—६—१९२२.

८ विद्यासेवक वर्ष ४, अंक ४—५.

—:०:—

श्री

हें चरित्र

श्रीमंत राजमान्य राजश्री

वासुदेवराव गणेश उर्फ आबासाहेब देशपांडे

ॲडिशनल जज्ज स्मॉलकॉजेस् कोर्ट, मुंबई

व

माजी संपादक, जगत्-समाचार, ठाणें

यांस, त्यांच्या वाङ्मयप्रेमाबद्दल

ग्रंथकर्त्यानें अत्यंत आदर-

पूर्वक अर्पण केलें

आहे.



वासुदेवराव गणेश उर्फ आबासाहेब देशपांडे

ॲडिशनल जज्ज स्मॉलकॉजेस् कोर्ट, मुंबई.

# सरदार मुरार बाजी देशपांडे याचें चरित्र.

यश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणासी नाहीं सीमा ॥
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ —( दासबोध ).

शिवाजीचा तो काल ह्मणजे मराठ्यांच्या स्वातंत्र्यरवीचा उषःकाल ! अर्थात् प्रभातकालच्या कोंवळ्या व सुवर्णमय किरणांप्रमाणें मनाची उल्हसित वृत्ति करणारा असा तो होता. ज्याप्रमाणें दिनमणीच्या मध्यान्हकालाच्या तेजोमय किरणांपेक्षां प्रभातकालचे आरक्त व बाल किरण मनांत जास्त आनंद, उल्हास व उमेद उत्पन्न करतात, त्याचप्रमाणें शिवाजीच्या कारकीर्दीच्या इतिहासाचें अध्ययन केल्यावर वाचकाच्या मनांत किती तरी सुखकर विचारांचें एकच काहूर उसळून जाऊन त्याची त्याच्याशीं तादात्म्यवृत्ति होऊन जाते ! आणि शिवाजीनें व त्याच्या कट्टया वीरांनीं केलेल्या अनुपमेय पराक्रमांचें वर्णन वाचल्यावर मन स्वदेशाभिमानाच्या सागरांत यथेच्छ पोहूं लागतें !

तत्कालीन महाराष्ट्रेतिहासांत जीं अनेक नर-रत्नें आपल्या मर्दुमकीनें, साहसानें व बुद्धिमत्तेनें प्रसिद्धीस आलीं, त्यांपैकीं सरदार मुरार बाजी देशपांडे हा एक होय ! या वीरानें २६४ वर्षांपूर्वी आपल्या दोन हजार सैन्याच्या साह्यानें शत्रूकडील अफाट सैन्याशीं केवळ स्वातंत्र्य आणि स्वराष्ट्रांकरितां निधड्या छातीनें झगडून आत्मबलिदान केलें व मराठ्यांच्या इतिहासांत आपलें नाव चिरंजीव करून ठेविलें त्याच्या गुणांचें स्मरण जनतेच्या हृदयांत जागृत होऊन त्या गुणांचा अंश प्रत्येकांत उतरावा अशा उदात्त हेतूनें या वीराचें अल्प चरित्र वाचकांस सादर करितों.

मुरार बाजीचा जन्म इतिहास प्रसिद्ध चांद्रसेनीय कायस्थ प्रभु ज्ञातींत भृग्वाचार्य-गोत्री नाडकर वंशांत शके १५३८ त झाला. उत्तर हिंदुस्थानांतून जीं चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंचीं कुटुंबें दक्षिणेंत सन १३०५ त आलीं, त्यांत वीरसेन चंद्रहास नाडकर व विश्वनाथ बाळाजी नाचणे हीं नांवें प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रांत आल्या-नंतर या घराण्यांनीं आपला जम तेथें बसविण्याकरितां प्रथम देशपांडे-पणाचीं व कुळकर्णीपणाचीं वतनें संपादन करून नंतर राजकारणांत शिरकाव करून घेतला. बहामनी राज्यांत व नंतर त्याचे विभागांत ह्यांतील कांहीं पुरुष उदयास आले. कांहीं विजयानगरच्या हिंदु राज्यांतहि नोकरींत असावे, असें इतिहासावरून अनुमान निघतें. त्यांच्या हुद्यांवरून त्यांच्या वंशजांस निरनिराळीं आडनांवें प्रचारांत आलीं व सांप्रत चालू आहेत तीं:– (१) नाडकर (२) नाचणे किंवा नागले (३) देशपांडे (४) पोतनीस (५) कुळकर्णी (६) कारखानीस (७) मोकाशी इ. इ.

सोबत दिलेल्या वंशावळीवरून पाहतां कानप्रभुपासून महाराष्ट्रांत हें घराणें विशेष प्रसिद्धीस आलेलें असावें. पण तत्कालीन महत्वाची ऐतिहासिक माहिती उपलब्ध न झाल्यामुळें त्याचें विवेचन येथें करणें अशक्य आहे. तरी पण कानप्रभुपासुन मुरार बाजी हा पांचवा पुरुष आहे; तेव्हा प्रत्येक पिढी साधारण पंचवीस वर्षांची गणली तरी हें घराणें यापूर्वी सव्वाशें वर्षें महाराष्ट्रांत प्रमुखत्वानें वावरत होतें असें म्हणावयास हरकत नाहीं.

मुरार बाजीचे वडील बाजी मुरार हे विजापुरच्या अदिलशाहीचा सरदार चंद्रराव मोरे याचे पथकांत प्रमुख होते. त्यांनीं त्यावेळीं आपला पराक्रम मोऱ्याच्या चांगलाच निदर्शनास आणिला होता. सन १६३६ त विजापुरच्या महंमद अदिलशहाची व मोगलांची लढाई झाली, त्या लढाईंत मोऱ्याच्या पथकांत बाजी मुरार होता. त्यांत मोगलांचा मोड होऊन त्यांस विनशर्त निघून जावें लागलें. या वेळचा बाजी मुरारचा पराक्रम महंमद अदिलशहाच्या चांगलाच नजरेस आला. आणि म्हणून अदिलशहानें त्यास " उमराव " हा बहुमानाचा किताब दिला. इतकेंच नव्हे तर त्यास मोऱ्याच्या पथकांतून काढून मोठ्या सन्मानानें दरबारी सरंजामानिशीं आपल्या दरबारीं ठेविलें. त्यास पांच मुलगे होते. त्यांचीं नांवें–

( १ ) मुरार बाजी ( २ ) त्रिंबक बाजी ( ३ ) शंकराजी बाजी ( ४ ) संभाजी बाजी व ( ५ ) महादाजी बाजी. या पांच भावांचा वंश 'पंच बाजींचा वंश' या नांवानें प्रसिद्ध होता. हे सर्व बंधु मराठेशाहींत स्वराज्यकारणांत विशेष उपयोगास आले, हें इतिहासप्रसिद्धच आहे.

बाजी मुरार यास महंमद अदिलशहानें आपल्या दरबारीं नेल्यानंतर, त्याच्या नेमणुकीवर मोऱ्यानें त्याचा वडील मुलगा मुरार बाजी यास नेमिलें (१६३७). तेव्हांपासून शिवाजी मोऱ्याचा उच्छेद करीपर्यंत तो त्याजकडेच होता. तेथें त्यानें केलेल्या लढायांत विलक्षण शौर्य गाजवून अनेक महत्वाचे जय मिळविले होते, आणि म्हणूनच मोऱ्यांची त्याजवर बहाल मर्जी बसली होती.

मुरार बाजीचा व त्याच्या वडिलांचा विशेष संबंध मोऱ्याबरोबर असून शिवाजीचा व त्याचा प्रत्यक्ष संबंध कसा जडला याचा इतिहासदृष्ट्या विचार करितां जावळी व मोरे यांचा उल्लेख करणें अवश्य असल्यामुळें येथें थोडक्यांत उल्लेख करितों.

मोरे हे मूळचे उत्तर हिंदुस्थानांतील मौर्य होत, मौर्यांचें राज्य नष्ट झाल्यावर ते सर्वत्र पसरले विजयनगरच्या राज्यांत मोरे नोकर होते. पुढें मुसलमानांनीं तें राज्य बळकावल्यानंतर युसफ अदिलशहा याच्या कारकीर्दींत, पहिला बाजीराव मोरे उदयास आला तो मोठा शूर व धाडशी होता. डोण प्रांतांतील एका भयंकर वाघास मारून, त्यानें यूसफ पासून १८ तर्फाच्या जावळी प्रांताची जहागीर संपादन केली. वाघ मारल्यावरून पुढें 'बागराव' असें त्याचें टोपण नांव पडलें. याच 'बागराव'ला युसफनें पुढें 'चंद्रराव' ही पदवी दिली, व दहा हजार सैन्याचा सरदार केलें. तत्कालीन बारा मावळांच्या देशमुखांना व इतर जमीनदारांनाहि मुसलमान पादशहा अशा प्रकारच्या पदव्या वारंवार देत असत व त्यांनीं पादशहाशीं राजनिष्ठ राहावें एवढाच अशा पदव्यांचा उद्देश असे. जावळी हा प्रांत पूर्वीं शिरक्यांच्या ताब्यांत होता. तो बाजीराव मोरे चंद्रराव, यानें जिंकून घेतला. त्याचप्रमाणें कृष्णा व वारणा यांजमधील सर्व प्रांत काबीज करून मावळांतील निरनिराळया देशमुखांना त्यानें आपल्या बाजूस ओढलें, आणि जावळी हें आपल्या राज्याचें मुख्य ठिकाण केलें.

या बाजीरावाचा सहावा वंशज दुसरा बाजीराव मोरे होय. हा निपुत्रिक वारल्यामुळें त्याची बायको माणकाबाई हिनें पहिल्या बाजीराव मोऱ्याच्या पुत्रांपैकीं एका पुत्राच्या शाखेंतील एक मुलगा दत्तक घेतला, व त्याचें नांव कृष्णाजी असें ठेविलें. हाच कृष्णराव शिवाजीच्या वेळीं हयात होता. हा जरी विजापुरकरांचा सरदार होता तरी स्वतंत्रच वागत असे.

शिवाजीला जावळीवर मोहिम करण्यास अनेक कारणें झालीं. शिवाजीनी घाटमाथ्यावरील प्रदेश काबीज केल्यानंतर मोऱ्याच्या प्रांताशीं त्याची सरहद्द भिडली आणि तेव्हांपासून कृष्णाजी मोऱ्यानें त्यास उपद्रव देण्यास सुरवात केली. त्या वेळीं मोरे मोठे जुलमी झाले होते. त्यांनीं बावधन वाडी लुटून तेथील कुणब्यांना मारलें, वाजकरांचे खून पाडले, बिरवाडीच्या पाटलांचीं वतनें बळकावलीं व सिलिंबकरांची देशमुखी नाहींशी करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारें आपल्याच संस्थानांतील प्रजेवर त्यांनीं जुलूम चालविला होता. या खेरीज शिवाजी विरुद्ध त्याचीं कारस्थानें चालूच होतीं. शिवाजीच्या राजांतील अपराध्यांनीं त्यांच्या राज्यांतून काळें करावें व कृष्णरावाच्या आश्रयाखालीं खुशाल राहावें. अफझुलखान वगैरेसारख्या लोकांनीं शिवाजीवर स्वारी करण्याचें मनांत आणलें, कीं लागलेंच कृष्णाजी मोऱ्यानें त्यांस आपल्या हद्दींतून वाट करून द्यावी इतकेंच नव्हे, तर शिवाजीच्या शत्रूंस प्रत्यक्षपणें मदत करावी असें वारंवार घडत असे.

मोऱ्याविरुद्ध त्याची प्रजा शिवाजीकडे येऊन, त्याला मदत करावयास उत्सुक असे. तथापि शिवाजीनें आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें कृष्णाजी मोऱ्यानें स्वराज्याच्या प्रयत्नास साह्य करावें म्हणून त्याला समजाविण्याची शिकस्त केली. इतकेंच नव्हे तर शिवाजीनें मोऱ्याचे सर्व अपराध पोटांत घातले परंतु त्यानें आपला हट्ट सोडला नाहीं. उलट पक्षीं, मोरे मात्र स्वराज्यद्रोही बनून शिवाजीस विश्वासघातानें पकडण्याच्या फंदांत पडला ! तो असा:–कृष्णराव मोऱ्याचा दौलतराव या नांवाचा एक भाऊबंद शिवथरास रहात असे. त्याच्या साहाय्यानें कृष्णरावानें शिवाजीस पकडलें. पण दग्यानें पकडलेला शिवाजी, दौलतरावाच्या तावडींतून केव्हांच निसटून गेला. उलट शिवाजीनें पुढें बाबाजी सिलिंबकराकडून दौलतरावास पकडून, त्यास योग्य शासन दिलें, व जावळीवर स्वारी कर-

ण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें सैन्याच्या दोन तुकड्या करून एक तुकडी सर नौबत व रघुनाथ बल्लाळ सबनीस यांजबरोबर देऊन त्यांस जावळीवर हल्ला करण्याकरितां पाठविलें, व आयत्या वेळीं त्यांस कुमक करितां यावी म्हणून स्वतः शिवाजी महाबळेश्वरीं दुसरी तुकडी घेऊन राहिला. लढाईस सकाळींच प्रारंभ झाला. मोऱ्याचा सेनापति सूर्यराव, हा त्याचा भाऊबंद होता. त्याची व रघुनाथ बल्लाळ याची पहिली चकमक झाली, तींतच सूर्यराव मारला गेला. त्यानंतर कृष्णराव मोरे स्वतः सैन्य घेऊन रणांगणावर धाऊन आला, तोंच शिवाजीहि आपल्या सैन्यासह चालून गेला. घोर रणकंदन झालें. त्यांत कृष्णरावास आपला पाडाव होतो असें वाटतांच तो रायरीस पळून गेला. शके १५७७ पौष वद्य १४ मंगळवार ( १५ जानेवारी १६५६ ) रोजीं जावळीवर शिवाजीचें निशाण फडकलें.

कृष्णराव मोरे रायरी येथें पळून गेला, त्याचा पाठलाग शिवाजीनें केला. कृष्णरावानें आपल्या सरदाराच्या साह्यानें तीन महिने रायरीचा किल्ला मोठ्या शौर्यानें लढविला. या वेळीं मुरार बाजीनें आपल्या शौर्याची कमाल केली; पण कृष्णरावाजवळील आत्मरक्षणाचीं साधनें संपुष्टांत आलीं आणि इतर ठिकाणाहून त्यास मदत मिळण्याची आशा नव्हती. निरुपाय झाला, तेव्हां कृष्णराव शरण आला (१५७८ चा वैशाख). इतकेंच नव्हे तर बाबाजी सिलिंबकरानें त्याला शिवाजीच्या पायावर घातलें. शिवाजीनेंहि कांहीं अटीवर त्यास क्षमा केली. “चंद्रराव मोरे याजवरील स्वारींत मुरार बाजी शिवाजीच्या फौजेशीं मोठ्या निकरानें लढला, परंतु तो हतवीर्य होऊन मोरे यांचीं मुलेंमाणसें शिवाजीचे हातीं पडलीं. मुरार बाजीस आमचे नोकरींत याल तर तुमचा जीव वांचवितों” (म. रि. ३०१). या संबधीं ‘प्रभुरत्नमाला’ पा. ५० मध्यें हकीगत दिली आहे तीः– ” तुम्हांस (कृष्णराव मोरे) जर जीवदान पाहिजे असेल, तर मुरार बाजी यानें आपल्या लष्करासह आमची नोकरी आमरण करावी. यास कबूल नसाल तर तुम्हांस मारणें इष्ट आहे. ही अति उग्र अट पाहून कृष्णरावास फारच वाईट वाटलें; त्यानें मुरार बाजीस बोलावून आणून त्याजकडून ही गोष्ट कबूल करविली. आपल्या धन्याचे पंचप्राण ज्या रीतीनें वांचतील तो मार्ग मुरार बाजीस स्वीकारावा लागला. मुरार बाजीनें शिवाजीची मागणी कृष्णरावाच्या सांगण्यावरून कबूल केली, व तो आपल्या दोनशें लोकांनिशीं शिवाजीच्या चाकरीस राहिला.” दुसरी अट अशी

होती कीं ' कृष्णरावानें मुसलमानांविरुद्ध आपणास मदत करावी. ' या अटीवर त्याजकडे जावळीची जहागीर पुन: दिली. पण कृष्णरावानें शिवाजीच्या विरुद्ध विजापूरकरांशीं गुप्त पत्रव्यवहार चालू केला होता, तो शिवाजीच्या गुप्त हेरांनीं पकडला. तेव्हां शिवाजीनें त्याची रीतसर चौकशी केली, पण कृष्णरावानें ही गोष्ट साफ नाकारली. तेव्हां शिवाजीनं त्याचीं अस्सल पत्रें त्यास दाखविलीं आणि त्याजवर राजद्रोहाचा आरोप ठेवून मृत्यूची शिक्षा फर्माविली. याप्रमाणें मोऱ्यांची वासलात लागली.

चंद्रराव मोरे याचेबद्दल आदिलशहाचें मन किती कलुषित झालेलें होतें, हें पुढील उताऱ्यावरून कळेल. " जावळीचा चंद्रराव मोरे हा विजापूरच्या आदिलशहाचा मांडलीक होता. शिवाजीनें सन १६४३ पासून १६५६ पर्यंत घाटमाथ्यावर स्वतंत्र सत्ता स्थापण्याचा उपक्रम केला होता. ही सत्ता पुण्यापासून रोहिड खोऱ्यापर्यंत वाढून शिवाजीच्या प्रांताची हद्द चंद्रराव मोरे याच्या हद्दीला येऊन भिडली. ह्यावेळीं तो विजापूरकराचा केवळ नामधारी मांडलीक होता तो स्वतंत्रपणानें वागूं लागला, हेंच त्याच्या नाशास कारण झालें. त्याजवर शिवाजीनें स्वारी केली, त्या वेळीं विजापूरकरांनीं त्यास मदत केली नाहीं. इतकेंच नव्हे तर शिवाजीनें मोऱ्याचा मुलूख कावीज केल्यामुळें आदिलशहास राग किंवा दुःख बिलकूल झालें नाहीं. उलट एक शिरजोर स्वातंत्र्येच्छू संस्थानिक नष्ट झाला हें पाहून त्याला प्राय: समाधानच वाटलें. " ( खंड ८ ).

मुरार बाजीचा पराक्रम शिवाजीच्या कानावर पूर्वीच आलेला होता. पण या रायरीच्या हल्ल्याच्या वेळीं तो प्रत्यक्ष अनुभवास आला. तेव्हां अशा वीरास हस्तगत करणें त्यास अवश्य वाटलें. "गुणी गुणान्वेत्ति" हें शिवाजीस उत्कृष्ट साध्य झालेलें होतें. पण हें स्वराज्याच्या उदयकालानेंच साध्य झालें होतें. आणि म्हणूनच असे वीर त्यास अचूक रीतीनें प्राप्त करून घेतां आले. असो. शिवाजीनें, कृष्णराव मोऱ्याच्या अनुज्ञेनें भ्रातृवर्गासह मुरार बाजीस स्वराज्याच्या साह्यास घेतलें आणि त्यास पांच हजाराची सरदारी दिली. " मुरार बाजी देशपांडे महाडकर, हषम पांच हजार, त्यांचे सरदार. " (शि. दि. १८७) हा वेळपयत मोऱ्याविषयीं त्याच्या मनांत पूज्यभाव होता व कृष्णराव मोऱ्याचा प्राण वांचविण्याकरितां व त्याच्या परवानगीनें, मुरार बाजी शिवाजीच्या राजकार्यात दाखल झाला.

यापुढील आपलें सर्व आयुष्य आपल्या देशांतील लोकांचें धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य राखण्याचे कामीं खर्च करावयाचें असा त्यानें आपल्या मनाचा निर्धार केला व तो आमरण पाळला.

या महत्वाच्या कार्याची मुख्य भूमिका पुरंदरचा किल्ला. त्याची माहिती वाचकांस करून दिल्यावांचून खरी परिस्थिति त्यांच्या लक्षांत येणें अशक्य होईल. करितां त्याची थोडक्यांत माहिती देतों:--पुरंदरचा किल्ला केव्हां व कोणी बांधिला याची माहिती उपलब्ध नाहीं, पण हा किल्ला बराच जुना असावा. बहामनीराज्य-संस्थापक अल्लाउद्दीन हसन कांगो यानें या किल्ल्याची दुरुस्ती सन १३५० त केल्याचा उल्लेख आहे. सन १३८४ त बहामनी राज्यपैकीं एकानें या किल्ल्यावर अर्धवर्तुळाकार नवे बुरूज बांधले. सन १४८६ त हा किल्ला निजामशाहीच्या ताब्यांत आला. सन १५९६ त बहादुर निजामशहानें मालोजीराजे भोसले याला पुणें व सुपें प्रांताची जहागिर दिली, त्यांत हा किल्ला मालोजीच्या ताब्यांत आला. त्याच्या पश्चात् सन १६२७ पर्यंत हा किल्ला शहाजीराजे भोसले यांच्या ताब्यांत होता, पण त्याच वर्षीं तो मोगलांनीं घेतला. तो शहाजीराजे यांनीं विजापुरतर्फे सन १६३७ त मोगलापासून सर करून घेतला. अदिलशहा व मोगल यांच्यामध्यें झालेल्या तहानें हा किल्ला पुढें अदिलशाहाकडे राहिला. सन १६४७ त पुरंदरचा किल्लेदार निळकंठ नाईक हा दिवंगत झाल्यानंतर त्याच्या मुलांकडून हा किल्ला शिवाजीस मिळाला.

हा किल्ला पुण्याच्या आग्नेय दिशेला सुमारें वीस मैलांवर आहे. समुद्रसपाटी-पासून याची उंची जवळ जवळ पंचेचाळीसशें फूट आहे. म्हणजे हा महाबळेश्वरापेक्षांहि किंचित् उंच आहे. हा सिंहगडापेक्षां दोनशें फूट अधिक उंच आहे, व पुण्याच्यावर पंचवीसशें फूट आहे. हल्लीं पुण्याहून पुरंदरला जाण्याला तीन रस्ते आहेत. दोन बैलगाड्या व टांगा जाण्यासारखे चांगले आहेत. एक जुना रस्ता आहे. हल्लीं त्यानें गाड्या जात नाहींत. पण हाच पूर्वीचा हमरस्ता होता. हाच रस्ता पुण्या-पासून सरळ पुरंदरला जातो. जुन्या काळचा पुण्याहून साताऱ्याला जाण्याचा हाच रस्ता होता. याला बापदेवखिंडीचा रस्ता म्हणतात. या रस्त्यानें पुण्याहून पुरंदर फक्त वीस मैल आहे. परंतु हा रस्ता हल्लीं फारसा वापरांत नाहीं. हल्लींचा रस्ता सासवडावरून आहे. पुण्याहून सासवड वीस मैल व सासवडाहून पुरंदर

सहा मैल आहे. तिसरा रस्ता कापूरवहाळेकडून आहे. कापूरवहाळेहून पुरंदर आठ मैल आहे. भोराहून पुण्याला येतांना वाटेंत कापूरवहाळें हा गांव लागतो, तेथून पुरंदर किल्ला उत्तम दृग्गोचर होतो. कापूरवहाळेंपासून हल्लीं पुरंदरला जाण्याला उत्तम सडक आहे. पुण्याहून कापुरवहाळें सुमारें चोवीस मैल आहे. हा रस्ता लांबचा आहे, पण या रस्त्यानें गेल्यास पुरंदरचें खरें वैभव व उंची दिसून येते. सासवडच्या बाजूनें हा किल्ला फारसा उंच भासत नाहीं. कारण पुण्यापेक्षां सासवड हें पठारावर असल्यामुळें बरेंच उंच आहे. सासवडपासून पुरंदर प्रथम दिसत नाहीं तर वज्रगड दिसतो. वज्रगड अगदीं सासवडच्या समोरच आहे. वज्रगड पुरंदराच्या पुढें असल्यामुळें सासवडच्या बाजूनें येतांना तो पुरंदरला झांकून टाकतो. पुण्याहून वावदेव खिंडीवरून आलें म्हणजे मात्र वज्रगड डाव्या बाजूला तर पुरंदर उजव्या बाजूला दिसतात, तेव्हां पुरंदरची उंची, त्याचा विस्तार व बालेकिल्ल्याचा बिकटपणा स्पष्टपणें दृग्गोचर होतात. सासवडहून निघणाऱ्या रस्त्यालाच नारायणपुराजवळ कापूरवहाळकडून येणारा रस्ता येऊन मिळतो. किल्ल्याच्या पायथ्याशीं पेठ म्हणून खेडें आहे. किल्ल्याच्या पहिल्या भागाला माची म्हणतात. याच भागांतून पूर्वीं सर्व वस्ती होती. येथून मुख्य किल्ला किंवा बालेकिल्ला आणखी तीनशें फूट उंच आहे. हाच बालेकिल्ला फार दुर्भेद्य आहे. माचीपर्यंतचा डोंगर फार बिकट नाहीं. पण बालेकिल्ला मात्र निव्वळ तुटलेल्या कड्याचा बनलेला आहे आणि त्यावर जाण्यास दिल्लीदरवाजा खेरीज दुसरी वाट नाहीं. पहिल्या माचीभोंवतीं पूर्वकाळीं सर्व बाजूंनीं तट व बुरूज होते. पण या तटांपैकीं बराच भाग आतां पडला आहे. तरीपण तटाचा दरवाजा बऱ्या स्थितींत आहे. त्याला बिनी दरवाजा म्हणतात. पुरंदरावर दोन तलाव आहेत—( १ ) मुकारशी तलाव व ( २ ) पद्मावती तलाव. माचीच्या भागाला भैरवखिंड म्हणतात. येथून वरच्या बालेकिल्ल्याचा तुटलेला कडा दिसतो. पुरंदर व वज्रगड यांमधलीच ही खिंड आहे. येथून डोंगराला थोडा वळसा घालून वज्रगडावर जातां येतें. बालेकिल्ला हा सुळक्यासारखा उभा आहे.

माचीवरून बालेकिल्ल्याचा चढाव फार नाहीं, पण बिकट आहे. कांहीं ठिकाणीं तर खडकांत ओबडधोबड व अरुंद पायऱ्या खोदून रस्ता केलेला आहे. दिल्लीदरवाजांतून आंत गेलें, कीं एकामागून एक दरवाजे व बुरूज

लागत जातात. हे सर्व दरवाजे किल्ल्याच्या सुरक्षितपणाच्या दृष्टीनें बांधलेले आहेत व त्यावरून किल्ल्याची दुर्भेद्यता ध्यानांत येते. बालेकिल्ला म्हणजे पुरंदर डोंगराचें शेवटचें पठार होय. हें पठार पूर्वपश्चिम लांबट आहे. सर्व दरवाज्यांतून आंत गेल्यावर थोडी रुंदी जास्त आहे; पण कांहीं ठिकाणीं पठार मुळींच नाहीं, तर फक्त अत्यंत अरुंद अशी डोंगराची पातच आहे. या बाले-किल्ल्यासभोंवतीं तटबंदी आहे व मधून मधून संरक्षणाकरितां बुरूज आहेत. दिल्लीदरवाजांतून डाव्या बाजूनें गेलें म्हणजे अत्यंत अरुंद अशा डोंगराच्या कड्यावरून आपण कंडकडा नांवाच्या बुरुजावर येतों. हें बालेकिल्ल्याचें पूर्वेकडील टोंक होय. येथून वज्रगड व भीमा नदीच्या कांठचा प्रदेश दिसतो. येथून परत दिल्लीदरवाजाकडे येऊन उजव्या बाजूनें पुढें गेलें म्हणजे वावटा बुरूज लागतो. त्याजवळ धान्य ठेवण्याची एक इमारत लागते. पश्चिमेच्या बाजूला पुढें गेलें म्हणजे किल्ल्यांतील शिबंदीकरितां तेलातुपाचे सांठे करण्याचें हौद दिसतात. याच्या जरा पुढें गेलें म्हणजे एक डोंगराचें उंच टेंकाड लागतें. याला राजाचा वाडा म्हणतात. कारण शाहू महाराजांनीं येथें एक राजवाडा बांधण्यास सुरवात केली होती; पण हें काम अर्धवटच राहिलें. जवळच म्हसोबा टाकी म्हणून उत्तम पाण्याचें टाकें आहे. येथून पुढें किल्ल्यांतील सर्वांत उंच टेंकाडाचा रस्ता लागतो. हा रस्ता कांहीं ठिकाणीं पाऊलवाटेइतकाच रुंद आहे. दोन्ही बाजूला सारखा तुटलेला कडा व खालीं अफाट दऱ्या आहेत. तेथून वर गेल्यावर एक महा-देवाचें देवालय उंचीवर आहे. त्याला केदारेश्वर म्हणतात. या देवळाच्या चौथऱ्यावर उभें राहून नुसती दृष्टि फिरविली, कीं लांबपर्यंत चारी दिशांचा प्रदेश एकसमयावच्छेदेंकरून दृग्गोचर होतो आणि मनाला विलक्षण आश्चर्य वाटतें. अशा या दुर्भेद्य किल्ल्यावर मुरार बाजीची अखंड कीर्ति झाली.

कोणत्याहि देशांत राष्ट्रैक्याची व स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली, कीं या पवित्र कार्यास दडपून टाकण्यास प्रबळ शत्रू टपलेलाच असतो. पण जनतेच्या हृद-यांत जागृत झालेली स्वातंत्र्याची इच्छा मात्र त्याला दडपून टाकतां येत नाहीं. स्वातंत्र्यासाठीं जनतेनें स्वीकारलेल्या खडतर व्रताचें फल म्हणूनच परमेश्वर त्या राष्ट्राला स्वातंत्र्य देतो. शिवाजीनीं राष्ट्रैक्याची व स्वातंत्र्याची मोहीम चालू केली. ती चिरडून टाकण्यासाठीं प्रथम अदिलशाहीकडून प्रयत्न झाला पण

तो निरर्थक ठरला. पण पुढें शिवाजीच्या वाढत्या सत्तेचा दर्प सहन न झाल्यामुळें औरंगजेबानें शाहिस्तेखानास शिवाजीवर पाठविलें. त्यास शिवाजीनीं शास्त लावल्यामुळें, शिवाजीवर कोणातरी मोठ्या जबरदस्त सरदाराला धाडणें औरंगजेबाला भाग पडलें. तेव्हां मिर्झाराजा जयसिंग व दिलीरखान यांना धाडण्यांत आलें, व त्यांच्या हाताखालीं दाऊदखानाची दुय्यम सेनापति म्हणून नेमणूक करण्यांत येऊन त्याला पांचहजारी मनसब देण्यांत आली. ते आपल्या प्रचंड चमूसह पुण्यांत येऊन दाखल झाले, व मुळींच लढाई न करितां त्यांनीं मराठ्यांचा देश काबीज करण्यास आरंभ केला. त्यावेळीं पुरंदर व सिंहगड हे दोन किल्ले पुणें प्रांताचीं नाकीं म्हणून फार प्रख्यात होते. जर हे दोन किल्ले आपल्या हस्तगत झाले, तर सगळा पुणें प्रांत मिळाल्यासारखा होऊन मराठी राज्याला बराच धक्का बसण्याचा संभव आहे, असा विचार करून त्या दोन सरदारांनीं आपला मोर्चा त्या किल्ल्यांकडे वळविला. त्यावेळीं दाऊदकडे कात्रजच्या घाटाचें रक्षण करण्याचें काम सोंपविण्यांत आलें होतें. चार दिवसांनीं जयसिंगानें आपल्याकडे त्याला बोलाविलें. जयसिंग यावेळीं कात्रजच्या पलिकडे होता व दिलीर हा पुरंदरच्या तळाच्या आसपास वाडीच्या जवळ वेढा देण्यासाठीं चांगलीशी जागा शोधून काढण्याच्या खटपटींत होता. पण या वेळीं मराठे कांहीं स्वस्थ बसलेले नव्हते. त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणांची नाकेबंदी केली होती. त्यांत पुरंदरच्या किल्ल्याचा बंदोबस्त मुरार बाजीकडे सोंपविला होता. पुरंदरावर आलेलें संकट फार भयंकर आहे, पण त्यांतूनहि तारण्याचें सामर्थ्य जर कोणाला असेल तर तें मुरार बाजीलाच आहे, हें शिवाजी जाणून होताच. मुरार बाजीनें शत्रूंना तोंड देण्यासाठीं आपल्या सैन्याची उभारणी केली. किल्ल्याच्या रक्षणाकरितां तो जिवापाड श्रम करूं लागला. किल्ल्यांत अन्नसामुग्री करणें, युद्धोपयोगी जिनसांचा भरणा करणें, शत्रूंवर छापा कोणीकडून व कसा घालावयाचा, किल्ल्याच्या रक्षणाची तजवीज कशी करावयाची वगैरे लष्करी कामाची योजना तो करूं लागला.

दिलीरनें आपली छावणी पुरंदरानजीक ठोकतांच मुरार बाजीनें किल्ल्याचा योग्य बंदोबस्त केला. मुरार बाजी हा शिवाजीच्या अस्सल चेल्यांपैकीं एक चेला असल्यामुळें दिलीरखानाची आशा भंग व्हावयाची होती हें त्याला काय माहित ? मुरार बाजी गनिमी काव्यांत कसलेला खंदा वीर ! तो का दिलीर सारख्या

जनानी सरदाराला दाद देणार ! आपल्या अंगांत खेळत असलेल्या स्वदेश-प्रीतीला व स्वामिनिष्ठेला कसोटीला लावण्याची सोन्यासारखी संधि आलेली पाहून तो मोठ्या आनंदानें किल्ला लढविण्याच्या व दिलीरास चांगलाच हात दाखविण्याच्या तयारीस लागला. आणि त्यानें कोणत्याहि संकटाला यापुढें जुमानलें नाहीं. मुरार बाजीचा पहिला प्रयत्न म्हटला म्हणजे लढाई न करितां गनिमी काव्यानें शत्रूला जेरीस आणून कालहरण करणें. असें केलें असतां लढाईला उत्सुक असलेलें सैन्य कंटाळून जाईल, व त्यांना रसद पोंचण्याचें बंद केल्यास उपासमारीमुळें तें हतवीर्य होईल. आणि मग अनायासें त्याची दाणादाण होऊन त्याचा पराभव करणें सुलभ जाईल; असें त्याचे मनानें घेतलें, आणि त्यांस अन्नसामुग्री न मिळूं देण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. पण मोगल सैन्य अनेक ठिकाणीं पसरल्यामुळें मराठ्यांचा हा प्रयत्न निष्फळ झाला. दुसरा प्रयत्न म्हटला म्हणजे रात्रीच्या प्रहरीं पठाणाच्या वेषांत गुप्त रूपानें शत्रूच्या छावणींत शिरून त्यांच्या हालचालींकडे लक्ष ठेवून त्यांचा दारुगोळा लुटणें व पेटवून देणें. हे त्याचे प्रयत्न चांगलेच यशस्वी झाले. या अचानक होणाऱ्या हल्ल्यानें दिलीर अगदीं त्रस्त होऊन गेला. तशांत दारुगोळा जाळून टाकल्यामुळें तो अगदीं हताश होऊन गेला. आणि जयसिंगाकडून मदत येईपर्यंत त्यास दांत-ओंठ चावीत अगदीं स्वस्थ बसावें लागलें. दिलीरचा इतका बंदोबस्त असतांना त्याच्या छावणींत शिरून अचानक रीतीनें छापा घालणें हें युद्धकौशल्याच्या दृष्टीनें फारच धाडसाचें आणि पराक्रमाचें कृत्य होतें. एवढ्या कालांत दिलीरनें हल्ला चढविण्यासाठीं पुष्कळ यत्न केले, पण मुरार बाजीनें त्यास हुलकावणी दाखवून बचावाचच धोरण स्वीकारल्यामुळें त्याचा नाइलाज झाला.

दिलीरला जयसिंगाकडून युद्धसामुग्रीची मदत येतांच त्यानें चढावाचें धोरण स्वीकारलें. इकडे मुरार बाजीन आपल्या जवळ असलेल्या निवडक दोन हजार मावळे व हेटकरी लोकांनिशीं किल्ला शिकस्तीनें लढविण्याचें ठरविलें व लोकांच्या अंगांत वीरश्री उत्पन्न होण्यासारखा उपदेश केला. दिलीर बेसावध आहे असें पाहून पुरंदरच्या माचीवर असलेल्या मुरार बाजीच्या एका तुकडीनें त्याजवर अचानक हल्ला करून त्यास भंडावून टाकलें व त्याचा तळ उधळून लाविला. ( ३० मार्च ). या हल्ल्यानें मुरार बाजीचा प्रत्यक्ष असा कांहीं फायदा झाला?

नाहीं. तथापि उत्तम प्रकारच्या रणसामुग्रीनें युक्त असलेल्या मोगल सैन्याचा पराभव आपण करू शकतों, अर्थात मोगल सैन्य कांहीं अजिंक्य आहे असें नाहीं, अशी भावना किल्ल्यावरील लोकांत उत्पन्न करून देण्यास हा हल्ला कारणीभूत झाला, व किल्ल्यांतील लोकांस अफाट मोगल सैन्याचा जो मोठा बाऊ वाटत होता, तो कमी होऊन त्याजबरोबर दोन हात करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होऊं लागली.

दिलीरचा तळ उधळून लावला, ही बातमी जयसिंगास कळतांच त्यानें आपले सरदार रायसिंग, कीर्तसिंग, कुबदखान, मित्रसेन, इंद्रमण बुंदेला यांच्या हाताखालीं तीन हजार घोडदळ देऊन तावडतोब दिलीरच्या मदतीस पाठविलें व आपण स्वत: त्याच्यामागें जाण्याचें ठरवून दाऊदला वर सांगितल्याप्रमाणें तळाचें रक्षण करण्यासाठीं तातडीनें बोलावणें पाठविलें. पण दाऊद हा जयसिंगाकडे न जातां दिलीरच्या मदतीस निघून गेला. अर्थात् जयसिंगास तळ सोडतां आला नाहीं. मात्र त्यानें मदतीसाठीं आणखी थोडेंसें सैन्य दिलीरकडे पाठविलें. नंतर दुसरे दिवशीं ( ३१ मार्च ) जयसिंगानें तळ हालवून सासवड पुरंदर यांच्या मध्यें आपलें सैन्य ठेविलें. आणि पुरंदरास शके १५८७ च्या वैशाखांत ( १६६५ एप्रील-मे ) वेढा घालून दाऊद व कीर्तसिंग यांच्याकडे किल्ल्याची ईशान्य बाजू सोंपवून त्याचें रक्षण करण्याचें काम आपल्याकडे घेतलें.

दाऊदकडे जी बाजू होती ती पुरंदरच्या मागची असून दाऊदचें तोंड खिडकी दरवाजाकडे होतें. हा चोर दरवाजा होता. दाऊदच्या मदतीस राजा जयसिंग, रामसिंग, शेरसिंग, राजसिंग वगैरे रजपूत सरदार व सालेतुरखान वगैरे मुसलमान सरदार होते. रुद्रमाळ ऊर्फ वज्रगड हा आधीं काबीज करण्याकरितां जयसिंगानें वेढा घालून हल्ला चढविला. ( १४ एप्रील ) त्याजबरोबर त्या किल्ल्याचा संरक्षक बावाजी बोवाजी यानें चांगलाच सामना केला व थोडक्याच अवधींत त्याचा भाऊ यशवंतराव बोवाजी त्याच्या मदतीस धाऊन आला. ते आपल्या तुटपुंज्या लोकांनिशीं मोगलांच्या अफाट सैन्याबरोबर निकरानें लढूं लागले. पण शत्रूच्या अफाट सैन्यानें किल्ल्याची मोर्चेबंदी करून टाकल्यामुळें त्यांस बाहेरून मदत मिळणें अशक्य झालें. तरीपण संकटसमय आणि निराशापूर्ण अशा परिस्थितीमध्येंहि आपल्या स्वामिनिष्ठेला आणि आपल्या क्षात्रवृत्तीला

जागावयाचें आणि फलाची आशा नसतांहि आपलें कर्तव्यकर्म करावयाचें अशी उदात्त वृत्ति त्यांनीं स्वीकारली आणि जिवावर उदार होऊन शत्रूबरोवर लढण्याचा शिकस्तीचा प्रयत्न चालू केला. आणि किल्ल्याला वेढा घालणाऱ्या लोकांवर वरून दगडांचा व गोळ्यांचा भडिमार केला. या मारानें त्यांनीं बरेंच शत्रुसैन्य गारद केलें! पण शत्रूचें सैन्य फारच असून त्यांनीं नाक्याच्या सर्व जागा रोखून धरल्या होत्या. असें असतांहि त्यांनीं धीर सोडला नाहीं. कांहीं झालें तरी किल्ल्याचा त्याग करावयाचा नाहीं असा त्या किल्लेदारांनीं निश्चय केला. त्यांनीं आपल्या तुटपुंज्या लोकांनिशीं शत्रूच्या सेनेवरोवर लढणें म्हणजे जरी शुद्ध वेडेपणा होता, तरी प्रसंगाप्रमाणें त्यांनीं आपलें कर्तव्य वजाविलें. कित्येक दिवस त्यांनीं शत्रूंस अडवून धरलें. या प्रसंगीं आत्मबल, शौर्य आणि धडाडी हीं त्यांनीं शत्रूच्या चांगलींच निदर्शनास आणून दिलीं. त्यांस पुरंदरावरून मुरार बाजी मदत पाठवील अशी आशा होती. पण पुरंदरासहि वेढा पडून माचीस सुरुंग लागले, आतां मुरार बाजीकडून मदत मिळण्याची आशा नष्ट झाली. तेव्हां त्यांनीं 'देह जावो अथवा राहो' अशा निर्धारानें रणांगणांत उडी ठोकली व आपल्या शौर्याची मात करून महाराष्ट्रासाठीं आत्मसमर्पण केलें. तेव्हांच रुद्रमाळचा किल्ला जयसिंगाच्या स्वाधीन झाला. "पुरंदरचे ईशान्येस वज्रगड म्हणून दुसरा एक लहानसा किल्ला आहे. त्यास रुद्रमाळ असें नांव होतें. तो किल्ला बाबाजी बोवाजी व यशवंतराव बोवाजी या दोघा प्रभु बंधूंच्या ताब्यांत होता. परंतु त्यांच्याजवळ फौजेचा पुरवठा चांगला नव्हता. दिलीरखानानें त्या किल्ल्यास वेढा घातला, तेव्हां मुरार बाजी आपणांस सोडविण्याकरितां पुरंदरावरून येईल या भरंवशावर रुद्रमाळच्या तुटपुंज्या लष्करानें मोगलांशीं पुष्कळ वेळ चांगलाच टिकाव धरिला. तेथें झालेल्या हातघाईत वरील दोन प्रभु सरदार पडले, आणि किल्ला मोगलांस मिळाला." (म. रि. ३०३). या रुद्रमाळावर जयसिंगानें तीन प्रचंड तोफा साडेतीन दिवसांत चढविल्या व त्यांच्या साह्यानें मुख्य किल्ल्याच्या समोरच्या तटावर मारा केला. हा रुद्रमाळ म्हणजे पुरंदरचें नाक आहे. ज्याच्या ताब्यांत तो जाईल तो पुरंदर काबीज करूं शकेल. जयसिंगानें तर त्याला पुरंदर किल्ल्याचें कुलूप उघडणारी किल्ली असेंच म्हटलें आहे. यानंतर पुरंदरास वेढा पक्का बसला असें पाहून जयसिंग स्वतः कांहीं सैन्यासह पुरंदराहून निघून मराठ्यांच्या राज्यांत पुरंदराच्या आसपास लूट व जाळपोळ करण्यास निघून गेला.

दाऊद ज्या बाजूस होता, त्या बाजूचें रक्षण त्यानें इमानानें केलं नाहीं, तर तो शिवाजीस फितूर झाला, आणि त्यानें आपल्या मोर्चांतून शिवाजीनें पाठविलेली रसद किल्ल्यावर जाऊं दिली, असा एक आरोप मुसलमान बखरकारांनीं त्याचेवर केला आहे. मराठी बखरकार याबद्दल असें म्हणतात कीं, " ते समयीं महाराजांनीं राजगडाहून केदार दरवाजाकडून रसद पोहोंचविली. लोकांची भरती केली. वरचेवरी मदत करते झाले. मोर्चे मारून उठवून दिल्हे. " ( स. प्र. चि. व. ). यावरून दाऊदकडील बाजू जो चोर दरवाजा ऊर्फ केदार दरवाजा ( ? ) त्याच बाजूनें शिवाजीनीं गडावर सामुग्री पुरविली असें दिसतें. आतां या वेळीं दाऊदला शिवाजीनीं वश करून घेतलें होतें कीं नाहीं याचा स्पष्ट निकाल लागत नाहीं. पण दाऊदचा स्वभाव पक्का स्वामिनिष्ठ होता. आणि म्हणून तो फितूर होणें शक्य दिसत नाहीं. कदाचित् त्याच्या हाताखालील वर उल्लेखिलेले रजपूत सरदार शिवाजीला आंतून मिळाले असण्याचा संभव आहे. हिंदुराज्य स्थापणाऱ्या महापुरुषास मुसलमानांच्या व विशेषतः औरंगजेबाच्या जुलमानें त्रस्त झालेले रजपूत आंतून मिळणें शक्य दिसतें. शिवाय औरंगजेबाचा खरा विश्वास कोणावरहि नसे; त्यामुळें त्याच्याबद्दल व त्याच्या कृत्याबद्दल त्याच्या नोकर लोकांत आपलेपणाची भावना प्रखर नसे, ढिली असे. आपल्याला दाऊदसारख्या मुसलमानाच्या हाताखालीं नेमण्यांत आल्यामुळें कदाचित् हे सरदार विषण्ण झाले असतील. कदाचित् दाऊदहि नाराज झाला असावा. कारण तो इकडे येण्यापूर्वी बिहारचा सुभेदार होता. त्यानें व दिलीरनें सारख्या अधिकारावर राहून सुजाशीं युद्ध चालविलें होतें. त्यावेळीं दाऊद हा दिलीरच्या हाताखालीं नोकर नव्हता. आज मात्र त्याची सुभेदाराची जागा जाऊन तो दिलीरच्या हाताखालीं दुय्यम सेनापति म्हणून राहिला होता; आणि त्याच्यावर सूक्ष्म देखरेख करण्यासाठीं म्हणून रजपूत सरदार त्याच्या जवळ ठेविले होते. या कारणामुळें खास दाऊदहि औरंगजेबावर आंतून नाराज झाला असावा, निदान तो बेफिकीर बनला असावा. कसेंहि असो, पण त्याच्या मोर्चांतून केदार दरवाजानें गडावर सामुग्री गेली खरी. आणि तिला त्यानें अडथळा केला नाहीं हेंहि खरें. ही बातमी समजल्यावर दिलीरनें दाऊदची कडक कानउघाडणी केली. तेव्हां त्या दोघांत बराच तंटा माजून राहिला. मग जयसिंगानें दाऊदला आपल्या हाताखालीं घेऊन केदार दरवाजाच्या बाजूच्या मोर्चांत परदिलखानास नेमलें व त्याच्या

मदतीस इंद्रमण बुंदेल्यास दिलें. पण प्रसंग कांहीं सुधारेना. शुभकर्णानें आंतून महाराजांसच मदत केली, असा आरोप मुसलमानांनीं त्याचेवरहि केला.

इकडे दाऊदनेंहि मुसलमानांची हिंमत खचविण्याचें काम चालविलें. तो म्हणे कीं, 'पुरंदर आपल्याला जिंकतां येणार नाहीं, मग विनाकारण तेथें माणसें खर्ची कां घालतां ?' जयसिंग म्हणतो, "दाऊदच्या मनांत असें होतें कीं, अशा कृतीनें दिलीरला नाउमेद करावयाचें व त्याला पुरंदरचा वेढा उठविण्यास लावून औरंगजेबापुढें त्याची नालस्ती करावयाची." यावर जयसिंगानें दाऊदला वेढ्यांतून काढून पुरंदरच्या आसपासचा मुलूख लुटणाऱ्या टोळयांवर नेमलें व त्याची ब्याद काढली.

दाऊदच्या हाताखालीं सहा हजार घोडेस्वार होते व बरेचसे रजपूत सरदारहि होते. दाऊदनें रोहिड्यावर प्रथम चाल करून पन्नास खेडीं जाळून पोळून फस्त केलीं. (२७ एप्रील) नंतर राजगडाच्या जवळचा प्रदेश लुटला. मात्र राजगडास वेढा घातला नाहीं. पुढें गुंजणखोऱ्यांत मुक्काम करून शिवापूर लुटून व सिंहगड येऱ्यांतील खेडीं जाळून पोळून दाऊद हा जयसिंगाच्या हुकमावरून परतला. (३ मे) लोहगडास शिवाजीनीं सैन्य जमविणें चालविलें आहे, असें समजल्यावरून जयसिंगानें दाऊदला पुण्यास बोलावून चिंचवड मार्गे लोहगडाकडे पाठविलें, व त्याच्या मदतीस कुतुबुद्दीनखानाच्या हाताखालीं सैन्य पाठविलें. दाऊद लोहगडाच्या पायथ्याशीं आल्यावर गडावरील मराठ्यांनीं त्याचेवर हल्ले चढविले व त्याला पळवून लाविलें. (५ मे) तेव्हां तो लोहगड, विसापूर, तुंग, तिकोना या किल्ल्यांच्या आसपासचा मुलुख लुटीत चालला व तीन वारांनीं परत पुरंदरास जाऊन मुख्य सैन्यांत सामील झाला. (१९ मे) अशा विकट परिस्थितींतहि मराठे गप्प नव्हते किंवा हताशहि झाले नव्हते. 'त्यांनीं आम्हांला सर्व तऱ्हेनें त्रास देऊन जिकेरीस आणलें.' अशी कबुली खाफीखानानें दिली आहे. (वि. से. व. ४ अं. ४-५.)

दिलीरनें पुरंदराला वेढा घातला हा सैन्याचा चौफेर गराडा मराठ्यांच्या लष्कराला पडलेला असल्यामुळें हा त्यांच्या सभोंवतालचा चक्रव्यूह फोडून त्यांना बाहेर जाणें शक्य नव्हतें; किंवा बाहेरून त्यांच्या मदतीला दुसरा कोणी येऊं म्हणेल तर तेंही कोणाला शक्य नव्हतें. आपल्या महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या संरक्षणा-

करितां जिवावर उदार होऊन लढण्याला तयार झालेल्या मुरार बाजीच्या मदतीला स्वदेशभक्तीच्या प्रेरणेनें धांवून जाण्याची इच्छा कोणास झाली असली तरी मोगलांच्या सैन्याच्या भीतीमुळें ती जागच्या जागींच जिरून गेली असेल.

या वेळीं मुरार बाजीजवळ फक्त दोन हजार सैन्य होतें पण तें निवडक होतें. तरी पण शत्रूच्या अफाट सैन्याबरोबर लढण्यास बाहेरून मदत आल्याखेरीज आपणास यश मिळणें अशक्य आहे व आपला पराभव होणार हें तो जाणून होता. पण भविष्यावर नजर ठेवून त्यानें किल्ला लढवावयाचा निश्चय केला.

एकदांचें मराठे व मोगल यांच्या मधील लढाईस तोंड लागलें. प्राण गेला तरी बेहत्तर पण माघार घ्यावयाची नाहीं, किंवा शत्रूला शरण जावयाचें नाहीं या निर्धारानें मुरार बाजी लढण्यास बाहेर पडला. तोफांच्या व बंदुकींच्या आवाजांनीं व ' हर हर महादेव ' व 'दीन दीन' ह्या रणगर्जनांनीं दसदिशा दणाणून गेल्या व आसपासच्या दऱ्याखोऱ्यांतून उद्भवणाऱ्या प्रतिध्वनींत " वीरांनो, लढा ! मरेपर्यंत लढा !! मेलां तरी बेहत्तर आहे, पण आज शिकस्तीनें लढून आपल्याला स्वर्गीय सुखाची जोड करून घ्या !!!" असे प्रोत्साहनपूर्वक शब्द निघताहेत, असा भास होत होता. मराठ्या गड्यांनीं लढण्याची तर कमाल करून सोडली.

किल्ल्याभोंवतीं शत्रूंच्या वेढ्याची मगरमिठी बसल्यानंतर तटबंदीच्या लहान लहान माची होत्या त्याहि त्यांनीं व्यापून टाकल्या. किल्ल्याकडे त्यांची प्रगति होऊं लागली. मधून मधून मुरार बाजीचे लोक त्यांचेवर जोराचे छापे घालीत. तोफांचा व बंदुकीचा मारा सारखा चालूच होता. मुरार बाजीच्या लोकांचे हल्ले इतक्या त्वेषाचे असत कीं, आत्मसमर्पणासाठीं त्यांचेमध्यें जणूं काय अहमहमिका लागली होती ! जाण्यायेण्याच्या मार्गावर शत्रूंच्या प्रेतांचा खच पडून, त्यांची अनेक वेळां त्रेधा उडाली व त्यांस पिछेहाट करावी लागली, पण संख्याबलापुढें त्यांचा निरुपाय झाला. दिलीरनेंहि आपल्या लोकांस शिकस्तीची चेतावणी देऊन गडाच्या माचीपर्यंत मोर्चे वाढवीत वाढवीत पूर्वेच्या कंदकडा बुरुजापर्यंत नेले. या बुरुजाजवळच ईशान्येस दिंडीदरवाजा (केदार दरवाजा) आहे. नंतर हळू हळू काळाबुरुज, पांढरा बुरुज वगैरे काबीज करण्यांत आले. आतां पुरंदराच्या संरक्षणाची कांहीं आशा राहिली नाहीं. तेव्हां पुढें काय करावें

हा प्रश्न मुरार बाजीच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. 'प्राण गेला तरी बेहत्तर पण माघार घ्यावयाची नाहीं.' असा मुरार बाजीचा निर्धार होता.

शिवाजीमहाराजांनीं स्वराज्यस्थापना करितांना, 'हें स्वराज्य म्हणजे भोसल्यांचें राज्य नव्हे किंवा उच्चवर्ण मराठे क्षत्रियांचेंहि राज्य नव्हे; राज्य बादशहाचें किंवा राजाचें नसून लोकांचें आहे.' ही कल्पना लोकांच्या अंतःकरणांत ठसविली. ही भावना प्यादयापासून फर्जीपर्यंत सर्वांच्या अंतःकरणांत बिंबली होती. 'स्वदेशाला स्वातंत्र्य मिळवावयासाठीं लढणें हें आपणाला शक्य आहे, आणि म्हणून तसें करणें आपलें कर्तव्य आहे; आपल्या देशावर जुलूम होत आहे आणि त्या जुलमाचा प्रतिकार करण्याच्या प्रयत्नाला आपण हातभार लावलाच पाहिजे.' ही कल्पना प्रत्येकाच्या मनांत वास करीत होती. आणि म्हणूनच ते आत्मबलिदान करण्यास तयार झाले होते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हे वीर भाडोत्री म्हणून वावरत नसत, तर स्वराज्यासाठीं व स्वधर्मासाठीं ते आपलें अंतःकरण व आयुष्य अर्पण करीत असत.

दिलीरखानानें पुरंदरावर निकराचा हल्ला चढविला, त्यावेळीं मुरार बाजी आपल्या मावळे व हेटकरी लोकांसह त्यांच्यावर तुटून पडला. मावळे व हेटकरी सर्वजण रात्रंदिवस एकसारखें लढून किल्ल्याच्या संरक्षणासाठीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत होते. सर्वांच्या अंगांत वीरश्रीचें वारें शिरलेलें होतें, आणि स्वराज्यभक्ति व स्वामिनिष्ठा यांच्या योगानें त्यांच्या शरीरांतील सामर्थ्य द्विगुणितपणानें वृद्धिंगत झालेलें होतें. हा शिवाजीमहाराजांचा किल्ला आहे, हा एक स्वातंत्र्याचा घटक आहे, अशा प्रकारच्या उच्च भावनांनीं प्रज्वलित झालेलीं त्या स्वातंत्र्याच्या योद्धयांचीं अंतःकरणें त्यांच्या मनगटांत दैवी सामर्थ्याची प्रेरणा करीत होतीं. महाराष्ट्रांतील एक अतिशय महत्वाच्या रणक्षेत्राच्या रंगभूमीवर आपण हें स्वातंत्र्याचें युद्ध खेळत आहों ! या वेळीं महाराष्ट्रांतील सगळया लोकांचे डोळे आपल्याकडे खालून वर लागलेले असतील! आणि आजपर्यंत आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरितां लढून आणि धारातीर्थी देह ठेवून जे मुक्त झाले, ते सर्व महाराष्ट्रीय वीरहि क्षणभर या युद्धदर्शनाच्या कुतूहलासाठीं तात्पुरते वायुमय देह धारण करून आकाशांतून खालीं आपल्याकडे पहात असतील ! तेव्हां अशा समयीं आपण पूर्ण शौर्यानें लढलें पाहिजे, अशा भावनेनें त्या सर्वांचीं मनें उद्दीपित

झालेलीं होतीं. सैन्यांतील लोकांची धांवपळ साऱ्या किल्ल्याभर चाललेली होती. तोफेंत भरलेला दारूगोळा पेटून उडण्याला जो अवकाश लागत होता, तोहि गोलंदाजांना सहन होत नव्हता, इतकी त्यांची उत्सुकता वाढलेली होती. एक शिपाई जायबंदी झाला, तर त्याची जागा घेण्याला दुसरा शिपाई पुढें आला नाहीं असा एकहि क्षण त्या वेळीं फुकट जात नव्हता. किल्ल्याच्या सभोंवतीं इतका धूर पसरवून दिला होता कीं, जणूं काय दाट धुकेंच पडलें आहे, असा भ्रम होत असे. मुरार बाजीचे लोक मोठया शौर्यानें आणि उत्साहानें लढत होते, तरी पण मुरार बाजीहि त्यांना प्रोत्साहन देत होता. इतक्या निस्सीम आणि निर्मळ अशा प्रकारच्या प्रयत्नांना यश यावयास पाहिजे होतें ! पण किल्ल्याच्या बाहेर फौजेचा जोर असता तर किल्ल्यांतील फौजांनीं टिकाव धरला असता ! बाहेरचें सैन्य आणि किल्ल्याच्या आंतील सैन्य या दोघांनीं मिळून मध्यंतरीं गांठलेल्या मोगल सैन्याला खात्रीनें ठेंचून काढलें असतें ! तरी पण त्यांनीं शत्रूंच्या अफाट सैन्याच्या विरुद्ध मोठ्या नेटानें लढाई चालविली होती. शत्रुसैन्य एका-मागून एक गढी घेत व किल्ल्याला सुरुंग लावून ते उडवून देत. अशा स्थितींत किल्ल्यांतील लोकांची काय अवस्था झाली असेल बरें ! याची कल्पना करणें कठीण आहे. आंतील लोक फक्त काय ते हजार बाराशेंच शिल्लक राहिले होते ! आणि त्यांना बाहेरून कोणी सोडविण्यास येईल अशी मुळींच आशा उरली नव्हती ! अशा स्थितींत केवळ स्वदेशभक्ति, स्वातंत्र्यप्रेम आणि पराक्रमाची नैसर्गिक हौस, एवढ्याच कारणांसाठीं ते किल्ल्यांतील शिपाई आपलीं शिरें आपल्या हातांत घेऊन आपल्या शत्रूंशीं निकरानें लढत होते. पण भोंवतालीं शत्रूंच्या अफाट सैन्याचा गराडा पडलेला आहे आणि त्यांच्या माऱ्याचा भडिमार रात्रंदिवस चाललेला आहे, अशा स्थितींत ते बिचारे मुरार बाजीचे लोक प्रामाणिक आणि पराक्रमी असले तरी किती दिवस कंठणार ! इतक्या विपत्तीमध्यें त्यांचा धीर यत्किंचितहि खचला नव्हता. ते किल्ल्याच्या तटावर जेथें तेथें उभे राहून वरून शत्रूंवर मारा करीत होते. मोठ्या वीरश्रीनें आणि पराक्रमानें किल्ल्यावरील लोकांनीं अनेक दिवस तो किल्ला लढविला. या वेळीं मुरार बाजीनें किल्ल्याच्या दरवाजाचें रक्षण करण्यासाठीं तानाजी शिवप्रभु व आपला भाऊ शंकराजी बाजी यांच्याजवळ आपल्या सैन्यापैकीं अर्धें सैन्य ठेऊन व अर्धें सैन्य आपणांबरोबर घेऊन शत्रुसैन्यावर अत्यंत त्वेषानें तुटून पडला. ह्या माऱ्यापुढें पठाण लोकांचा टिकाव लागेना, तेव्हां त्यांस माघार घ्यावी

लागली. लोक भयग्रस्त होऊन सैरावैरा धांवूं लागले. शत्रुसैन्याची ही दैन्यावस्था पाहिल्यावर त्यांचा धुव्वा उडवून देऊन स्वराज्याची प्रचंड इमारत जास्त बळकट व जोरदार करण्याची हीच उत्तम वेळ आहे असें वाटून, तो पुरंदरचा रणधुरंधर मुरार बाजी स्वदेशासाठीं व स्वधर्मासाठीं गाजी होऊन शत्रुसैन्याचा पाठलाग करीत आणि त्यांच्या शरीरांचे पर्वतप्राय ढीग पाडीत थेट दिलेरखानाच्या समोर येऊन धडकला.

मुरार बाजी अगदीं समीप आलेला पाहून दिलीरनें त्यास हांक मारून ह्मटलें, " मुरार बाजी, तूं मोठा शूर मर्द आहेस. तुझा हा अद्भुत पराक्रम पाहून मी चकित झालों आहें. या समयीं तूं कौल घेऊन माझ्या स्वाधीन हो ! मी तुला मोठ्या योग्यतेस चढवितों. " हे त्याचे शब्द ऐकून मुरारी त्याचा धिक्कार करून बोलला, " तूं तुर्क, तुझा हिसाब काय ? मी शिवप्रभूचा सेवक, तुझा कौल घेतों काय ? या रणांगणांत मी आपला देह अर्पण करीन, परंतु तुर्कास शरण जाणार नाहीं. " अशी मोठ्यानें गर्जना करून आपली समशेर पुढें करून मुरार बाजीनें त्यास युद्धाचें आव्हान केलें, आणि स्वतः ईर्षेनें लढूं लागला.

स्वराज्याच्या हिताकरितां मुरार बाजी इतक्या उत्कटत्वानें लढत होता कीं, त्या वेळीं त्यानें स्वतःच्या संरक्षणाचा अथवा हिताहिताचाहि कधीं विचार केला नाहीं. त्याची वागणूक इतकी चोख व निर्भीडपणाची होती कीं, दिलेरखानानें त्यास कौल घेण्यास सांगतांच त्याचा त्यानें खरपूस समाचार घेतला. कोणत्याहि राष्ट्रांत राज्यक्रांतीची धामधूम सुरू झाली म्हणजे कित्येक मोठमोठ्या कर्त्या पुरुषांना सत्ता व संपत्ति यांचें साधन करून आत्महित करून घेण्याची एकप्रकारें पर्वणीच येत असते. ही पर्वणी आली असतां आपला देशाभिमान व स्थूलमानानें आपली देशहितैकदृष्टीहि कायम ठेवून आत्मसाधनाच्या वाहत्या गंगेंत हात धुवून घेण्याचा मोह ज्याला होत नाहीं असा मनुष्य विरळा ! मुरार बाजी हा अशांपैकींच एक होता. अशा मनुष्याला निर्भीडपणामुळें कधीं कधीं स्वतःवर संकट ओढवून घेण्याची पाळी येते हें व्यवहारज्ञांस माहित असेलच. मुरार बाजीला हा कटु अनुभव आला. याला म्हणावें स्वार्थत्याग ! व हीच खरी उत्कट देशभक्ति ! असे पुरुष ज्या राष्ट्रांत निपजतात तें राष्ट्र खरोखरच भाग्यवान् होय ! !

मुरार बाजीनें दिलीरचें कौल स्वीकारिलें असतें, तर त्याला याहिपेक्षां अधिक मान्यता, मोठा अधिकार किंवा जहागीरहि देऊन त्यानें याचा किती बडेजाव केला असता हें त्या वेळच्या ऐतिहासिक पुराव्यांनीं आणि प्रत्यक्ष दिलीरच्या संभाषणावरून स्पष्ट होतें. पण मुरार बाजीनें या सर्व प्रकारच्या बलिष्ठ मोहजालांचे पाश तडातड तोडून अखेर हिंदवी स्वराज्यासाठीं निरपेक्ष आत्मबलिदान केलें, ही एकच गोष्ट इतिहासांत बिनतोड असून मुरार बाजीला वीरांत श्रेष्ठ पदवी देण्यास पुरे आहे. आणि म्हणूनच त्याचें स्वरूप इतकें उज्वल आणि प्रखर होतें कीं, त्याला महाराष्ट्राच्या इतिहासांतच काय पण भरतखंडाच्या इतिहासांतहि दुसरी तोड क्वचित्‌च सांपडेल! हें त्याचें स्वरूप म्हणजे त्याची प्रखरतर स्वराज्यनिष्ठा होय. हाच त्याच्या चरित्राचा विशेष असून त्याच्या शीलाचें तेज अधिक दैदीप्यमान व्हावें म्हणूनच हा प्रसंग येथें नमूद केला आहे.

या वेळीं मुरार बाजीचे लोक लढून लढून जरी थकले होते, तरी त्या प्रसंगानुसार वीरश्रीनें धुंद झालेल्या योध्यांच्या पुढें 'मारणें किंवा मरणें' हेंच ध्येय होतें. स्वदेशप्रीतीच्या वारुणीनें बहकलेला जो वीर त्याच्या पुढें कोण मायेचा पूत एक क्षणभर तरी दम धरणार ? दिलीरच्या समोर आल्यावर त्याची व दिलीरची चांगलीच जुंपली. दोघेहि मोठ्या शौर्यानें व आवेशानें लढत होते. लढतां लढतां मुरार बाजीच्या ढालीच्या हातास वार लागून ढाल हातांतून पडली. क्षणमात्र त्याच्या मनास चटका बसला. आज अविंधांना नामशेष करून आपल्या उज्ज्वल कीर्तीनें प्रफुल्लित झालेला आपला चेहरा महाराजांना दाखवून त्यांच्या तोंडून 'शाबास, धन्य आहेस मुरार बाजी' असे शब्द ऐकण्याचा सुखकर प्रसंग येत नाहीं म्हणून त्या वीराला जरा वाईटहि वाटलें. पण यत्किंचितहि न डगमगतां एकीकडे शत्रूचा खरपूस समाचार घेत घेत त्यानें आपल्या कमरेचा शेला हातास गुंडाळला व त्या हातावर शत्रूच्या समशेरीचे वार झेलून तो कर्दनकाळाप्रमाणें मोगलांची कत्तल करूं लागला. मोठ्या धडाडीनें लगट करून तो पुढें सरसावला, व अचूक दिलीरवर त्यानें आपल्या तलवारीचा वार केला; परंतु तो त्यास ओझरता लागल्यामुळें दिलीर बचावला व चिडून जाऊन, आतां या वीरास मारल्यावांचून गत्यंतर नाहीं असें जाणून, त्याच त्वेषानें त्यानें वार केला. त्या वारानें मुरार बाजीचें शीर उडालें व तो गतप्राण झाला (ता. २० मे सन १६६५). मुरार बाजीचें

शीर तुटून पडल्यावर त्याच्या धडानें शत्रूचे तीनशें लोक यमसदनास पाठविले, अशी आख्यायिका आहे. या वेळ्यांत मावळे व हेटकरी लोकांनीं दाखविलेलें शौर्य इतिहासांत संस्मरणीय आहे.

" शिवाजीच्या नामांकित शूर सरदारांत मुरार बाजीची गणना होते. धन्याची नोकरी बजावण्यांत आपले प्राण खर्ची घालून त्यानें आपल्या राष्ट्राची कीर्ति अजरामर केली आहे. मुरार बाजीचें शव त्याचे लोकांनीं मुसलमानांचे हातीं लागूं न देतां त्याचे तुकडे जमवून रायगडास शिवाजीकडे पाठविले. त्या वेळीं शिवाजीस किती दुःख झालें असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. " ( म. रि. ३०२ ). या संबंधानें आणखी एक महत्वाचा उतारा देतों:– "मराठ्यांनीं त्याचें शव मुसलमानांचे हातीं लागूं न देतां तें शिवाजीकडे पाठविलें. ' जीवित्व तृणवत् मानावें ' हा समर्थांचा बिनमोल उपदेश मनांत पूर्णपणें बिंबून स्वदेश व स्वधर्म यांसाठीं धारातीर्थीं पतन पावलेल्या मुरार बाजीचें मृत शरीर पाहिल्यावर सहृदय शिवबांच्या मनाची काय स्थिति झाली असेल व त्यांना किती तरी धन्यता वाटली असेल !" (न. र. हा. ४६.)

असो ! हातीं घेतलेलें काम पुरें करावयाइतकें आयुष्य देवानें त्याला दिलें नाहीं, पण त्याचे हातून जेवढें कांहीं झालें तेवढयामुळेंच जगाच्या इतिहासांत त्याला अढळ व अत्युच्च स्थान प्राप्त झालें आहे. आणि हा पराक्रम त्यानें ज्या पुरंदरच्या किल्ल्याच्या रणांगणावर करून दाखविला, त्या रणांगणावर दैवाच्या दुर्निवारतेमुळें जरी तो मरण पावला, तरी त्याची कीर्ति त्या ठिकाणीं आणि महाराष्ट्रीयांच्या सर्व अंतःकरणांमध्यें अद्यापिहि जिवंत आहे ! मुरार बाजीचा देह पुरंदराखालीं पतन पावला, पण त्याच्या कीर्तीची ध्वजा त्या ठिकाणीं कायमची उभारण्यांत आली आहे ! आणि महाराष्ट्रीय लोकांच्या अंतःकरणांमध्यें जोंपर्यंत आपल्या मागील इतिहासाची स्मृति जागृत आहे, तोंपर्यंत ती ध्वजा त्या ठिकाणीं नेहमीं फडकत राहील !

पण मुरार बाजी पडला तरी वरचा किल्ला मोगलांस मिळाला नाहीं; किल्ल्यांत अवशिष्ट राहिलेल्या लोकांनीं चांगला बंदोबस्त करून, मोगलांस वरचे कोटांत येऊं दिलें नाहीं. खालचे कोटांत त्यांचा प्रवेश झाला होता, परंतु वरून सारखा

मारा केल्यामुळें खालचा कोटहि त्यांस सोडून द्यावा लागला; व अखेरीस किल्ला घेण्याचा नाद सोडून देऊन दिलीर वेढा उठवून चालता झाला. मुरार बाजी-सारख्यांच्या अद्वितीय पराक्रमाचें वर्णन वाचल्यावर आमच्या वाचकांच्या मनांत आपल्या पूर्वजांविषयीं अभिमान व पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं, अशी आमची पक्की खात्री आहे.

मुरार बाजीस पुत्रसंतान नव्हतें. पण त्याच्या बायकोस शिवाजीनें उदर-निर्वाहाकरितां पुणें जिल्ह्यांत उरवडें येथें कांहीं जमीन दिली आहे. ती अद्याप त्याच्या भावाच्या वंशजांकडे आहे असें कळतें.

शिवकालीन इतिहासामध्यें अतुल पराक्रम, अचाट साहस, अलौकिक तेज, अद्वितीय रणोत्साह आणि अपार स्वाभिमान हे गुण व्यक्त करणारे जे कांहीं युद्धप्रसंग प्रसिद्ध आहेत, त्यांत पुरंदरचा रणसंग्राम हा गणण्यासारखा आहे यांत शंका नाहीं. या रणसंग्रामासंबंधीं मराठी बखरकारांनीं व ग्रंथकारांनीं वर्णनें केलीं आहेत. त्यांचे थोडक्यांत उतारे देऊन हें चरित्र पुरें करितो.

* * *

" शास्ताखान यास ( औरंगजेबानें ) परत बोलावून नेलें आणि मिरजाराजे जयसिंग यास सुभा सांगोन, दिलेलखान वगैरे फौज सरंजाम मोहिमेवर पाठविला. ह्यांणीं अवरंगाबादेस येऊन सुभ्याचा बंदोबस्त केला. तेथून सिंहगडास आले आणि मोर्चे बसविले. ते समयीं महाराज पुरंदरास यावयाचा विचार करून, लोकांस दिलासा देऊन निघोन किल्ल्यास दाखल जाले. तेथून लोकांचा जमाव करून, राजगडास यावें, मोर्चे मारावे, नसेल जिन्नस किराणा किल्ल्यावर तो पोंहचवावा; याप्रमाणें कांहीं दिवस किल्ला लढविला. जातीनीं मोर्चावर येऊन पडावें. लोक मनस्वी जायां केल्यामुळें, मिरजाराजे यांस महाराज आल्याचें वृत्त कळोन, सिंहगडाचा वेढा उठवून पुरंदरास लागले. महाराज यांचे लोकांनीं पेडगांवपर्यंत लोकांची रसद चालूं देऊं नये, मार्ग मारावे, फौजेवरी पडावे, मोर्चे कांपावे. ते समयीं मिरजाराजे व दिलेलखान यांणीं रुद्रमाळेकडून, डोंगरावर दमदमा रचला. तेथें तोफा ठेवून मार-गिरी केली, गोळे लागूं जाले. नारायणाकडूनही मोर्चेबंदी केली; परंतु किल्ल्यां-तून केदार दरवाजियांनीं लोक यावे आणि मोर्चे उधळून द्यावे. किल्ल्यावरील मनुष्य जेर न येई. ते समयीं मिरजाराजे यांणीं विचार केला कीं, ' महाराज हिंदु-

धर्मस्थापनेस उदित, आपण उपमर्द योजावा, तरी धर्मलोप होतो. हें सर्वथैव चांगलें नाहीं व शिवाजी मनुष्यांनीं, द्रव्यांनीं, हियानीं व दैवानीं अनकूळ आहे. त्याचा विपरीत काळ असता तरी जेर येता. त्यापेक्षां आपण व त्यांनीं एक व्हावें, हिंदुधर्म राखावा. विरुद्ध केल्यानीं अवदुलखान जातीनें मारला, शास्ताखानास जातीनें शास्ता केली, बहुत फौजा बुडविल्या, तेथें आपला पदार्थ किती ? एक एक किल्ला एक एक वर्ष लढला, तरी आपला प्रांत लागणार नाहीं. या अर्थी सल्ला करावा, ही उत्तम गोष्ट जाणून बोलणें लाविलें. सलुकाचे पोटीं हातीं घेऊन, उभयतां एक विचारें मसलत करावी. तो अर्थ दलेलखानास कळून, परम क्रोधायमान होऊन, ' हिंदु हिंदु एक आहेत, जालें. पादशाही दौलत बुडवावी, हे नजर ठेविली. काय चिंता आहे ? याचें पारिपत्य मी करीन.' असा अभिप्राय धरून, पुरंदरावर हल्ला चढविला. ते समयीं मुरार दादाजी ( बाजी ) प्रभु देशपांडे, पांच हजार मावळे व कोंकणे लोक घेऊन येऊन हल्ला कांपून काढला. दलेलखानापर्यंत तरवार मारीत यावें. असे हियाचा खबरदार माणूस, चांगला पाहून दलेलखान यांणीं मुरार बाजीस कौल आहे, येऊन भेटावें. त्यांणीं उत्तर दिल्हें कीं, महाराजांचे अन्नेंकडून हा जीव वाढला तो तुजकडे येणार नाहीं. तुझा हुकूम कशास पाहिजे ? तेव्हां खानानीं तीर चालविला. तो जिव्हारीं लागून गतप्राण झाले ! ” ( शि. दि. २३६ ).

* * *

“ ' बोलणीं करार करितां येतील ' असा ठराव झाला असतां दिलेलखान याचा विचार ' लागलीच भेट घेऊन बोलणीं पक्केपणांत आणून या जातीचा तह ठरवूं नये; सर्व पादशाहास लिहून पाठवून आज्ञा येईल त्याप्रमाणें पुढें विचार करावा. मतलब करून आलों. हा दावा वाढवून कांहीं प्रांत किल्ले घेऊन नंतर करणें तें करावें. पादशाहाकडून उत्तर येईपर्यंत आम्हीं पुरंधर घेतों, तुम्हीं सिंहगड घ्यावा ' असा आग्रह त्याचा पडला. ते समयीं ' शिवाजीराजे तहांनीं येतात हें वाईट नाहीं. पादशहाचे आज्ञेप्रमाणें त्यांचेहि बरें करून पादशाही मतलब मनांत आणून आपलेसे करावे. दौलताबाद तालुक्यांतील प्रांत किल्ले घेतले ते तहांनीं सोडवावे हें उत्तम,' असें जयसिंगानें सांगितलें असतां खानाचा आग्रह न सुटला. ' पादशाहास लिहून करणें तसें करूं ' म्हणून वकिलास निरोप दिला.

खान आपण कुच करून आले, ते पुरंधरानजीक येऊन त्यांनीं मोर्चेबंदी करून वेढा घातला. रुद्रमाळचे डोंगरावर दमदमे रचून तोफा चढवून मारगिरी केली. ' हल्ल्यांनीं किल्ला घ्यावा; हिसाब काय आहे? हल्ला करावा, ' असा विचार केला. ते समयीं महाराजांनीं राजगडाहून केदार दरवाजाकडून रसद पोंचविली. लोकांची भरती केली. वरचेवर मदत केली. मोर्चे मारून उधळून दिले. त्याजवरून फारच अभिमानें आग्रहास खान प्रवर्तला. आपली कुलजमीयत एक करून आपण खासा नारायणाचे देवालयापाशीं उभा राहून लोक पायउतारा करून किल्ल्यावर हल्ला चढविला. तोफांची मारगिरी करून पेंढार वगैरे पुढें घातलें. त्यांचे मागें गारदे; त्यांचे मागें पठाण लोक, तोफा त्यांमागें; असें करून आपणहि चालून घेतलें. याजवर किल्ल्यावरून मुरार बाजी देशपांडे महाडकर प्रभु मावळे लोकांचे सरदार होते, त्यांनीं लोक निवड करून धारकरी घेऊन हल्ल्यावर चालून घेतलें. पेंढार कापून काढून पिटलें. मागें पठाण हजार दोन हजार गोळी व तरवार चालवून रणीं पाडिले. मावळे लोकही बहुत पडले. सारा हल्ला डोंगराखालीं पिटीत आणिला. तेव्हां खासा दिलेलखान चालून गेला. त्याजवर मुरार बाजी लोकसुद्धां येऊन मारित सुटले. तेव्हां खान आपले जागां दंग झाला. पुढें हल्ला चालेनासें मुरार बाजी यानें केलें. खान तोंडांत बोट घालून चकित झाले. 'शिपाईगिरीची शर्त केली. मावळे लोक हे शिवाजीचा सैतानखाना आहे' म्हणून बोलले. ' कौल घ्यावा ' असें सांगून पाठविलें असतां ' तुम्हीं तुरुकडे तुमचा हिसाब काय? तुमचा कौल कशास पाहिजे? मी शिवाजीचा चाकर आहे. मरून खस्त होऊन तुम्हांस नामोहोरम करीन,' असें बोलून मुरार बाजी प्रभु यांनीं पुढें चालून घेतलें तेव्हां दिलेलखान याचे हाताचा तीर लागून आणखी जखमा बहुत चढून रणीं ठार पडले." ( शि. च. १०३ ).

* * *

"जयसिंगाच्या लष्करांत राजियाचा हेजीब आला होता हें वर्तमान दिलेलखानास कळून मनांत कष्टी जहाला. ' शेवटीं हिंदुस हिंदू मिळून काम जायां करतील ' ऐसें म्हणून दुसरे दिवशीं दिलेलखान मिरजाराजियाच्या भेटीस आला. आणि बोलूं लागला कीं, ' उगेच काय म्हणून बैसलेत? गोटाजवळ कोंढाणा व पुरंधर हे दोन किल्ले आहेत. पुरंधरास आपण सुलतानढवा ( जिवावर उदार होऊन किल्ल्यावर

हल्ला करीत चढणें ) करितों, आणि गड घेतों तुम्हीं कोंढाणा गड घेणें. गड घेत चालला म्हणजे शिवाजी येईल.' असें बोलतां मिरजाराजा बोलला जे, ' गड, आले तरि बरें. नाहीं तर नामोश ( लौकिक ) जाईल. याजकरितां गडास न लागावें. मुलुक कावीज करावा. गडास सामान चालों न द्यावें म्हणजे गड आपाप येतील. ' असें बोलतां, दिलेलखान रागें उठून चालिला. ' आपण आतांच जाऊन पुरंधर घेतों. तुम्ही कोंडाणा घ्याल तरि घेणें. ' असें म्हणून उठोन, गोटास येऊन नगारा करून, ढाल फिरंग घेऊन, पुरंधराखालें येऊन, मुक्काम करून गडावरि येलगार ( हल्ला ) केला. पायउतारा होऊन पांच हजार पठाण व दहा हजार बैले ( एक प्रकारचे लढाऊ लोक ) तोफाची पायउतारा जहाले. पेंढारी ( ! ) व आड-हत्यारी व खलाशी लोक वीस हजार लहान थोर पायउतारा होऊन लगट करीत चालले.

तेव्हां पुरंधरावरि नामजाद ( विख्यात ) लोकांचा सरदार राजियाचा मुरार बाजी प्रभु म्हणोन होता. त्याजबरोबर हजार माणूस होते. या खेरीज किल्ल्यांचे एक हजार होते. असे दोन हजार लोक होते. त्यांत निवड करून मुरार बाजी यांनीं सातशें माणूस घेऊन ( ते ) गडाखालें दिलेलखानावरि आले. दिलेलखान तोलदार जोरावर पठाण पांच हजार यांखेरीज बैले वगैरे लोक ऐसी फौज गडास चौतर्फा चढत होती, त्यांत जाऊन सरमिसळ जहाले. मोठें घोरांदर युद्ध जहालें. मावळे लोकांनीं व खासा मुरार बाजी यांनीं निदान करून ( निकरावर येऊन ) भांडण केलें. पांचशें पठाण लष्कर ठार जहाले. तसेंच बहिले मारिले. खासा मुरार बाजी प्रभु दिलेलखानाच्या देवडी पावेतों साठी माणसांनिशीं मारीत शिरले. दिलेल-खान देवडी सोडून माघारा जहाला. आणि लोकांस सांगून तोफखाना व तिरंदाज बरच्या व आडहत्यारी एक हजार लोक यांजकडून मारा करविला. त्यामध्यें साठी लोक पडिले. मुरार बाजी प्रभु यांनीं ढाल फिरंगी घेऊन दिलेलखानावरि चालोन आले. महाराजांचे नांवाजलेले लोक ते खर्च जहाले, आतां काय मुख दाखवावें? म्हणोन नीट चालोन जावें असें मनांत आणोन खानाशीं गांठ घातली. तेव्हां दिलेलखान बोलिला जे ' अरे तूं कौल घे. (आमच्या स्वाधीन हो). मोठा मर्दाना शिपाई तुज नांवाजितों.' ऐसें बोलतां मुरार बाजी बोलिला जे, 'तुझा कौल म्हणजे काय? मी शिवाजी राजाचा शिपाई, तुझा कौल घेतों कीं काय? '

म्हणून नीट खानावरि चालिला. खानावर तरवारीचा वार करावा तों खानानें आपले आंगें कमाण घेऊन, तीर मारून पुरा केला. तो पडला. मग खानानें तोंडांत अंगोळी घातली कीं, 'असा शिपाई खुदानें पैदा केला.' ऐसें आश्चर्य केलें. मुरार बाजी बरोबर तीनशें माणूस ठार जहाले." (सभासद. ४२)

* * *

"शिवाजी राजे किल्ले पुरंधरास येऊन वडगांवाहून रसद खजिना लम्हाण व रहदारी येत होती ते लुटून हस्तगत केली. हें वर्तमान मिरजा राजा यासीं विदित झालें. त्या समयीं सिंहगडाचा वेढा उठोन किल्ले पुरंधरास दलेलखान पठाण वगैरे कुलबावसुद्धां रुद्रमाळेखालीं डोंगर त्यावर मोर्चे करून तोफखाना सुरु केला. किल्ल्यावर गोळे येऊं लागले. नारायण पेठेकडून साठ हजार मावळे व शिवाजी राजे खुद्द नित्य भांडत होते. त्या समयीं मुरार दादजी (बाजी) प्रभु नामजाद लोकांचा सरदार व हजार माणूस शिवाय होते. व हजार माणूस त्याचे तैनातीस होतें व किल्लेदार लोक त्यामध्यें बरेच चांगले लोक धारकरी निवडक मुरार बाजी प्रभु सातशें लोकांनिशीं किल्याखालीं उतरून चाकरीचा प्रसंग जाणून चालोन गेले. ते खानाचे डेऱ्यापावेतों मारीत चालिले. लढाई बहुत तुंबळ झाली. ते समयीं पांचशें पठाण जिवें मारिले, खासा देवडी बाहेर तो मुरारप्रभु ढाल फिरंगा सांभाळून खाशावर चाल केली. तेव्हां दलेलखान मुरारप्रभुस बोलता झाला, कौल घेऊन आम्हांस भेटणें, तुमची सर्व प्रकारें सर्फराजी केली कीं, शिवाजीराजे यांचा सरदार त्यांचें अन्न भक्षिलें. भोसले खेरीज दुसऱ्याचा चाकर म्हणवावें या एवढा हरामखोर नाहीं, तुम्हीं मूर्ख आहां, तुमचा कौल घेऊन भेटीस यावें असा विचार नाहीं. असें बोलोन हरहर महादेव बोलून मर्दपणा करून खान लोकसुद्धां आला तों खानानीं पुर्ता मनसबा केला कीं, हा सरदार आमचें ऐकत नाहीं हरतजवीज करून जिवें मारावा, असा विचार करून तिरकमान घेऊन खानहि तिरंजाजी करून लढाई आहे तों अकस्मात मुरारप्रभु तीर लागून त्याच वेळेस पडला. त्याबरोबर तीनशें मावळे लोक लढाई करीत खर्च जाहले. हें वर्तमान महाराजांस विदित जाहलें. त्याची रवानगी करून त्याचे भाऊबंद हुजूर आणून आपल्याजवळ सर्फराज करून ठेविले." (भा. व. ९१ क. ब.)

* * *

"जयसिंगराजा याच्या कठकांत राजियाचा वकील आला होता ही खबर दलेलखान पठाण यास एकांती कळताच मनांत फार कष्टी जाह्लाला. सेवटी हिंदु हिंदु मिळोन काम नाश करतील असे मनांत आणून दुसरे दिसी दिलेलखान रोहिला मिर्जाराजियाचे भेटीस आला आणि बोलला की, तुम्हीं उगेच वसला गोटाजवळील कोंढाणागड व पुरंधरगड दोनी किल्ले आहेत पुरंधरासी मी सुलतान सेवा करोन गड घेतो तुम्ही कोंढाणागड घेणे घेतले म्हणजे शिवाजीराजेहि येतील. असे बोलताच मिरजाराजा बोलिला जे गड आले तर बरे नाहीं तर नामोसी जाईल याकरितां गडासी झट्ट नये आधी मुलुक काबीज करावा म्हणजे गड येतील असे बोलताच दिलेलखान रागाने उठोन चालीला आपण आताच जाऊन पुरंधर घेतो तुम्हीं कोंढाणा घेणे अथवा न घेणे असे म्हणोन उठोन गोटास येऊन कुचाचा नगारा केला आणि आपली फौज घेऊन पुरंधराखालीं येऊन राहिला नंतर गडा-वरील एलगारा करूं लागले खासा पांच हजार पठाणानिसी पायउतारा जाहाला सात आठ हजार रोहिले व बघेले व तोफा आणि पायउतारा जाहाला व पेंढा(वा)? री व आडाणी खलक वीस हजार लहान थोर पायउतारा होऊन गडासी लगट करीत चालिले तेव्हां पुरंधरावरी नामजादे लोक याचा सरदार राजीयाकडील मुरार-बाजी प्रभु म्हणोन एक हजार माणसानिसी होता त्याखेरीज किल्ल्याचे मावळे लोक एक हजार होते असे दोन हजार पावखलक त्यामध्ये निवडून मुरारबाजी हजार मनुष्ये घेऊन दिलेलखानावर चालून गेला दिलेलखान मोठा जोरावारा व तोलदार पठाण पांच हजार या खेरीज रोहिले व बगेल वगैरे लोक अशी फौज चौकडून गडास चढत होती त्यामध्यें जाऊन सरमिलस होऊन मोठे घोरघर युद्ध केले मावळे खलक याणी व मुरार बाजी प्रभु याणी निदान भांडण केले पाचशे पठाण पाडले तसेंच रोहिले व बगेले मारले खासा दिलेलखान देवडी सोडोन माघारा फिरला आणि लोकास सांगोन तोफखाना आणविला व राजयाकडील तिरंदाज व बर्चीवाले व आडहत्यारी असे त्यामध्ये ६० साठ लोक ठार पडले मुरार बाजी ढाल फिरंग घेऊन खासा दिलेलखानावर चालोन गेला तेव्हां दिलेल-खान रोहिला बोलला जे कौल घेणे तूं सिपाई तुजला नावाजितो असे बोलताच मुरार बाजी बोलला जे तुझा कौल म्हणजे काय मी शिवाजीराजे यांचा चाकर तुझा कौल घेतो की काय म्हणोन नीट खानावर चालिला दिलेलखानावर फिरं-

गीचा वार करावा तो खानाने आपले हाती कमान घेऊन एका तिराने मुरार बाजी पुरा केला तो पडला मग खानाने तोंडात आंगुली घातली की, असाही सिपाई खुदानें पैदा केला असे आश्चर्य केले मुरार बाजी पडला त्याबरोबर तीनसे माणुस ठार जाले." (म. द. रु. १ ला पा. ४६–४७)

* * *

"तो ( दिलेरखान ) पुरंदरचा वेढा विशेष निकरानें चालविण्यासाठीं तिकडे निघून गेला. त्यानें किल्ल्यास चोहोंकडून मोर्चेबंदी केली. ह्या किल्ल्याचा हवाला मुरार बाजी प्रभु नांवाच्या एका सरदाराकडे होता. शत्रूचें सैन्य जवळ येत आहे असें पाहून त्यानें त्यास दाणावैरण मिळूं नये अशी तजवीज करून व त्यावर पुन: पुन: छापे घालून त्यास बरेंच हैराण केलें होतें. शत्रूचा दारूगोळा पेटवून देऊन त्याची युद्धसामुग्री लंबे करण्याचा धूमधडाका त्यानें चालविला होता. शत्रु पाठीस लागला म्हणजे फरारी होऊन किल्ल्यांत येऊन बसावयाचें असा क्रम त्यानें कांहीं दिवस ठेविला होता. परंतु अखेरीस त्याला पुरंदर किल्ल्यांत कोंडून त्याच्या सभोंवतीं शत्रूनें सैन्याचा वेढा दिला. हा मुरार बाजी अतिशयित शूर व हुशार होता. त्याच्या हाताखालीं त्यावेळीं अवघे दोन हजार मावळे व हेटकरी होते. किल्ल्यांत दारूगोळा व धान्यादि सामुग्री पुष्कळ करून ठेविली होती. मुरारबाजीनें व त्याच्या लोकांनीं किल्ल्याचें रक्षण बरेच दिवस मोठ्या शौर्यानें केलें. शत्रूचें सैन्य एवढें मोठें होतें तरी त्यास मुळींच दाद दिली नाहीं. किल्ल्याखालीं हजारों मोंगल धडपड करून प्राणास मुकले. त्यांस किल्ल्याजवळ जातां येईना. महाराजांनीं रायगडावरून केदारदरवाजाकडून रसद पोंचविली व लोकांची भरती केली. किल्ल्याच्या एका माचीवर बुरुजाखालील खडकाला सुरुंग लावून तो पाडून आंत शिरण्याचा बेत दिलेरखानानें करून त्या कामाला आपले लोक लाविले. हें किल्ल्यावरच्या लोकांनीं पाहून त्या माणसांवर पुन: पुनः छापे घालून त्यांस नको जीव असें केलें. त्या कामीं शत्रूकडील शेंकडों माणसांचे बळी पडले; परंतु त्यांचा जमाव फारच मोठा असल्याकारणानें हें सुरुंग लावण्याचें काम शेवटास जाऊन बुरूज जमीनदोस्त झाला व शत्रूच्या लोकांचा किल्ल्याच्या त्या माचीवर प्रवेश झाला. त्यांनीं आंत शिरतांच घरें लुटून जाळून टाकण्याचा सपाटा चालविला तों इकडे हेटकरी लोकांनीं आपला अचुक गोळीबार असा झपाट्यानें

सुरू केला कीं, त्यासरशीं शत्रूच्या लोकांची अगदीं धांदल उडाली. ते सैरावैरा पळत सुटले जो तो आपला जीव बचावण्यासाठीं कोठें तरी छपून राहण्यास जागा पाहूं लागला. ह्याप्रमाणें त्यांची दाणादाण झाली असतां खानाचे आणखी लोक मोठ्या जमावानें किल्ल्यावर चढून येऊं लागले. त्यांच्यावर मुरार बाजी आपल्या निवडक मावळ्यांसह एकदम चालून गेला. उभय पक्षांकडच्या लोकांचें मोठ्या निकराचें युद्ध झालें. मावळ्यांच्या तरवारींच्या सपाट्याखालीं दोन हजार मोगल व पठाण रणांत पडले. मावळेहि बरेच धारातीर्थीं पतन पावले. तरी त्यांनीं शत्रूचा हल्ला डोंगराखालीं मोठ्या नेटानें पिटून लाविला. खानाचे लोक वाट मिळेल तिकडे पळत सुटले. खान स्वतः नारायणाच्या देवळापाशीं हत्तीवर स्वार होऊन उभा होता. आपल्या लोकांची दाणादाण झालेली पाहून त्यास अतिशयित चेव आला. त्यानें आपला तिरकमठा सज्ज केला व पुढें सरसावून आपल्या पठाणांस मुरार बाजीवर चालून जावयास हुकूम केला. लोक पळत सुटले होते, त्यांस मागें परतवून त्यांसह तो स्वतः मावळ्यांवर तुटून पडला. ह्या समयीं मुरार बाजीनें आपल्या शौर्याची अगदीं शिकस्त केली. त्यानें दिलेरखानाचें पाऊल जरासुद्धां पुढें पडूं दिलें नाहीं. पठाण एवढे कडवे होते तरी आवेशाचें वारें अंगांत पुरें संचरलेल्या मावळ्यांच्या तरवारींपुढें त्यांचें कांहींएक चालेना. मुरार बाजी तर अगदीं जिवावर उदार झाला होता. खानाचे लोक फार, त्यांनीं आपल्या किल्ल्याच्या एका माचीला सुरुंग लावून ती कमजोर केली आहे; आपला ह्या रणकंदनांत मोड होऊन किल्ला हातचा जाणार; तेव्हां महाराजांचे शेंकडों लोक व्यर्थ खर्ची घातल्याचें अपयश घेऊन त्यांस काय तोंड दाखवावें ? असा विचार करून तो स्वतः ढालफिरंग घेऊन आपल्या लोकांपुढें होऊन त्यांस धीर व उत्तेजन देत मोठ्या आवेशानें लढत होता. लढतां लढतां त्याला समोर खानाचा हत्ती दिसला. त्यासरसा तो पुरुषसिंह त्याच्यावर चालून गेला. त्यावेळीं त्याची ढाल तुटून तो शत्रूचे प्रहार हातास शेला गुंडाळून त्यावर घेत होता. तो अगदीं जवळ आला असें पाहून खानानें त्याला हांक मारून म्हटलें, " तूं मोठा शूर शिपाई आहेस, तुझा हा आजचा अद्भुत पराक्रम पाहून मी केवळ चकित झालों आहें. तूं ह्या समयीं कौल घेऊन माझ्या स्वाधीन हो. मी तुला मोठ्या योग्यतेस चढवितों." हे त्याचे शब्द ऐकून मुरार बाजी त्याचा धिक्कार करून बोलला,

" तुम्ही तुकडे ! तुमचा हिसाब काय ? मी शिवाजीराजाचा नोकर आहें. मी तुझा कौल घेतों कीं काय ? मी ह्या रणांत आपला देहपात करीन, परंतु तुम्हांस शरण येणार नाहीं." असें बोलून खानावर आपल्या तरवारीचा वार करण्याच्या बेतांत तो होता, इतक्यांत खानानें तीर मारून त्याचें शीर उडविलें. " ( के. शि. च. २५२ ).

*		*		*

पुरुषोत्तम कवीच्या शिवकाव्य नामक संस्कृत ग्रंथांत पांचव्या चमत्कारांत मुरार बाजीच्या पराक्रमाचें सुरस वर्णन दिलेलें आहे तें:—

दुर्गं रुरोध पृतनापतिभिः समंताद्-
यंत्रोद्भवाय स चलद्गुरुगोलकानाम् ॥
वृष्टिं चकार गिरिमूर्धगता भटास्तु
क्षुब्धा बभूवुरितरत्र गतौ न शेकुः ॥ ५१ ॥

वर्षासु मेघ इव वर्षति पर्वतेऽस्मिन्
नाम्ना मुराररिति राजनियोजितो यः ॥
कायस्थजो दशशतप्रमितैः स पद्मैः
शूरैर्वृतोऽवतरति स्म कृपाणपाणिः ॥ ५२ ॥

वीरो युयोध तुमुलं सह पत्तिसंघै-
र्निःशस्त्रखड्गशरतोमरऋष्टिभल्लैः ॥
पादाहतं रज उपेत्य रविं रुरोध
पंकत्वमाप रुधिरौघपरिप्लुतं सत् ॥ ५३ ॥

अश्वाः क्रमेलनिचया अपि दंतिसंघाः
संच्छिन्नहस्तपदपुच्छमुखाः प्रपेतुः ॥
काकाश्च गृध्रवृकजंबुककोणपाद्याः
मोदं परं समुपजग्मुरसृक्प्रपानाः ॥ ५४ ॥

केचित्पलायनपराः प्रययुश्च भीताः
केचित्तृणं स्ववदने निदधुर्भृशार्ताः ॥
स्वीयान्पलायनपरान् यवनो विलोक्य
तानाह हे यवनपाः किमिदं विचित्रम् ॥ ५५ ॥

सर्वे वयं यवनजातिभवा महान्तः
शूरा धनुःप्रहरणा विदिता जगत्याम् ॥
युक्तं पलायनमिदं भवतां किमेतत्
द्रक्ष्यन्ति नैव वदनं भवतां सुदाराः ॥ ५६ ॥

वृत्तिर्विलेखनमनुष्य-मुरारिनाम्नः
कायस्थकस्य स विहाय निजां मृगेन्द्रः ॥
दंतिव्रजानिव पुरः समुपैति यूयं
वीरा अपीह विमुखा अपयाथ वो धिक् ॥ ५७ ॥

एवं वदत्यभयदे यवनाधिपेऽस्मिन्
खड्गं प्रगृह्य च पुरः प्रविधाय चर्म ॥
वीरो मुरारिरखिलैः पदगैः स साकम्
योद्धुं ययौ यवनपस्य पुरःप्रदेशम् ॥ ५८ ॥

हत्वा पदातिनिचयान्स्वपुरः प्रयातम्
दृष्ट्वा दलेलयवनश्चकितो बभूव ॥
स्वान्संहतान्भटगणान्पुरतो विधाय
सार्धं युयोध रिपुणा पुरतः स्थितेन ॥ ५९ ॥

तद्युद्धमुल्बणमभूत्साशिखाशिखानाम्
मध्याह्नगे सवितरि प्रचलत्कृपाणम् ॥
वीरा असृक्प्रसृतिभिः सहिता वसंते
ते किंशुका सकुसुमा इव रेजिरेऽत्र ॥ ६० ॥

संच्छिन्नपाणिपदका भुवि शेरते स्म
केचिद्विदष्टदशनच्छदमीयुरग्रे ॥
आलिंग्य भूमिमपरे रुरुदुः परे तु
क्रुद्धा विशालकरवालकराः प्रजह्रुः ॥ ६१ ॥

एवं सहस्रमितवीरवरा मुरारेः
क्षीणा दलेलयवनस्य तथा प्रहीणाः ॥
सज्जे शरं धनुषि वीरवरो निधाय
तस्थौ मुरारिरपि खङ्गकरोऽवतस्थे ॥ ६२ ॥

तं खङ्गपाणिमवदद्यवनो मुरारिम्
खङ्गं विहाय शरणं व्रज जीवदं माम् ॥
देवः शरण्य इह एष इतीरयित्वा
तस्याग्रतः समसरत्करवालपाणिः ॥ ६३ ॥

बाणेन तस्य हृदयं यवनो बिभेद
तीक्ष्णेन सोऽपि शिवशंकर पाहि मेति ॥
उक्त्वाशु कश्यपजमंडलमेष भित्त्वा
यातो दिवं दिविजकीर्तितकीर्तिमालः ॥ ६४ ॥

गत्वा ततः स यवनो गिरिदुर्गमस्य
द्वारिस्थितैः सह युयोध धनुर्धराग्र्यः ॥
तानाह मोघमरणं नहि युक्तमत्र
यातो मुरारिरविता भवतां पतिः सः ॥ ६५ ॥

ते प्राहुरेहि शिवभूपगृहे मुरारि—
तुल्यास्ततः समधिका इह सन्ति नूनम् ॥

( प्रभुरत्नमाला पा. ५९ )

# मुरार बाजीचा मृत्युदिन.

मुरार बाजीच्या मृत्युदिनासंबंधीं निश्चित असा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध झाला नाहीं, तेव्हां आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक माहितीवरून ता. २० मे सन १६६५ हा दिवस निश्चित केला, पण याच्या सत्यतेबद्दल जास्त पुरावा मिळावा म्हणून मुरार बाजीचे विद्यमान वंशज सरदार पोतनीस, रा. गोपिनाथराव पोतनीस व रा. दामोदरराव पोतनीस यांजकडे व त्याचप्रमाणें कांहीं इतिहाससंशोधकांकडे पत्रद्वारें विनंति करण्यांत आली. पण सरदार पोतनीस यांजकडून सदरहू माहिती उपलब्ध नसल्याचें पत्रद्वारें कळविण्यांत आलें आहे. यासंबंधीं केसरींत झालेला पत्रव्यवहार पुढीलप्रमाणें आहे:—

केसरी ता. २३—७–२९ :—पुरंदर गडावरील गडकरी मुरार बाजी यांची मृत्युतिथि कोणती अशी कित्येकांनीं पृच्छा केल्यावरून बडोद्याचे श्रीयुत वि. स. वाकसकर हे कळवितात कीं, "पुरंदरच्या किल्ल्यावर ता. ३० मार्च १६६५ रोजीं पहिला निकराचा हल्ला झाला. त्याच वेळीं मुरार बाजी मारला गेला असावा; कारण त्याच्या दुसऱ्याच दिवशीं शिवाजी पुरंदरावर येऊन दाखल झाला. यावरून मुरार बाजीची मृत्युतिथि ता. ३० मार्च १६६५ म्हणजे चैत्र कृ. १० शके १५८७ ही ठरते. यासंबंधीं मुरार बाजीचे वंशज पुण्याचे सरदार पोतनीस अधिक निश्चित माहिती देऊं शकतील काय ?

वरील लेखास आम्हीं उत्तर दिलें तें (ता. ६–८–२९):—ता. २३–७–२९ च्या 'केसरींत' वर्तमानसारांत श्री. वाकसकर यांनीं मुरार बाजीची मृत्युतिथि ता. ३० मार्च १६६५ म्हणजे चैत्र कृ. १० शके १५८७ ही ठरते असें दिलें आहे. पण माझ्या मतें 'विद्यासेवक' व. ४ अं. ४–५ यांत 'दाऊदखान व पुरंदरचें युद्ध' या मथळ्याखालीं श्री. आबा चांदोरकर यांच्या लेखांत दिलेर-खानाच्या हालचाली व त्यानें केलेला पुरंदर किल्ल्यावरील हल्ला याचें स्पष्टीकरण चांगलेंच केलेलें आहे व तेंच सयुक्तिक दिसतें. श्री. वाकसकरांनीं ता. ३० मार्चला मुरार बाजीचा मृत्यु दिला आहे. पण श्री. चांदोरकरांच्या लेखावरून दिलेरखानाचा पुरंदरावरील तळ मुरार बाजीच्या लोकांनीं त्या वेळीं उधळून लाविला, तेव्हां जयसिंगानें त्यास मदत पाठविली व ता. ३० मार्चला जय-

सिंगानें आपला तळ हालवून सासवड व पुरंदर यांच्यामध्यें ठेविला. पुढें दाऊद ता. १९ मे रोजीं पुरंदरला जाऊन दिलेरखानाच्या सैन्यांत सामील झाला, व नंतर पुरंदरावर निकराचा हल्ला चढविण्यांत आला. तो दुसऱ्या दिवशीं असावा, व त्या निकराच्या हल्ल्यांत मुरार बाजीचा मृत्यु झाला असावा. म्हणजे ता. २० मे १६६५ हा त्याचा मृत्युदिन असावा. श्री. यशवंतराव गुप्तेहि हीच तारीख खरी असावी असें म्हणतात.

श्रीमंत सरदार पोतनीस किंवा गोपिनाथराव पोतनीस यांजकडून ऐतिहासिक लेखांच्या आधारें मुरार बाजीचा मृत्युदिन कळेपर्यंत वरील तारीख खरी मानावी असें मला वाटतें.

वरील पत्रास श्री. वाकसकर यांचें उत्तर (ता. २७–८–२९):—ता. ३० मार्च १६६५ ही मुरार बाजीची मृत्युतिथि असावी असें मी प्रसिद्ध केल्यावर दादरचे रा. कुळकर्णी यांनीं तारीख १९ मे १६६५ ही मृत्युतिथि असल्याचें रा. आबा चांदोरकर यांच्या एका लेखाच्या आधारानें जाहीर केलें आहे. मी सांगितलेली तारीख खरी कां व रा. चांदोरकरांनीं दिलेली तारीख चुकीची कां हें थोडक्यांत सांगतों:—(१) मुरार बाजी कामास आला. (२) ता. ३० मार्च रोजींच असें द्वंद्व होणें शक्य आहे. कारण (३) ता. १९ मेच्या लढाईत दिलेर-खान हा हजर नसून कुतुबुद्दीनखान व दाऊदखान असे दोघे सरदार हजर होते, पण (४) विशेषत: ही लढाई ता. १९ मे रोजीं झाली नसून ता. ५ मे रोजीं झाली असावी असें प्रो. सरकार यांच्या श्रीशिवाजीच्या ३ ऱ्या आवृत्तीच्या पृ. १२० वरील विवेचनावरून दिसतें. (५) सारांश ता. १९ मे रोजीं लढाईच झाली नाहीं, त्या अर्थी ती तारीख मुरार बाजीची मृत्युतिथि होऊंच शकत नाहीं.

पुरंदरचा वेढा सरासरी २ महिने चालला होता. ता. ११ जून रोजीं पुरंदरच्या पायथ्याशीं सकाळीं ९–१० च्या सुमारास जयसिंग व शिवाजी यांची भेट होऊन तह ठरला, आणि वेढ्याच्या आरंभीं मुरार बाजी मारला गेला, असें प्रो. सरकार म्हणतात. "एक मुरार बाजी मारला गेला म्हणून काय झालें, आम्हीं प्रत्येकजण मुरार बाजी सारखेच शूर असून तेवढ्याच शौर्यानें शत्रूशीं लढूं." असे पुरंदरच्या सैन्याचे उद्गार सभासदानें पृष्ठ ४३–४४ वर दिले आहेत. त्यावरून सरकार यांच्या म्हणण्यास पुष्टि मिळते.

या एकंदर मुद्यांचा विचार करितां मुरार बाजीची मृत्युतिथि चैत्र वद्य ९-ता. ३० मार्च १६६५ हीच होय.

वरील पत्रास आम्ही उत्तर दिलें तें (ता. १०-९-२९):—ता. २३ जुलै व २७ ऑगस्टच्या केसरींत श्रीयुत वाकसकर यांनीं मुरार बाजीची मृत्युतिथि चैत्र वद्य ९-ता. ३० मार्च १६६५-आहे असें प्रतिपादन केलें आहे व ही तारीख प्रो. सरकार यांच्या श्री शिवाजीच्या चरित्रावरून सिद्ध होते म्हणून तीच खरी असें त्यांचें म्हणणें आहे. पण खालील माहितीवरून ही तारीख चुकीची ठरते.

(१) मराठी रियासतः—'जयसिंग ता. ७ मार्च १६६५ ला पुणें सोडून निघाला. ता. १४ मार्चला सासवडाकडे निघाला. ३१ मार्चला सासवडास पोहों-चला, आणि लगेच पुरंदरास वेढा घालण्याविषयीं त्यानें दिलेरखानास आज्ञा केली (पा. ३००). यावरून पाहतां ता. ३१ मार्चपर्यंत दिलीरचा पुरंदरास वेढा नव्हता. तो पुरंदराजवळ तळ देऊन बसला होता आणि मुरार बाजी त्याच्या हालचालीवर नजर ठेवून हल्ले चढवीत होता वगैरे हकीकत प्रसिद्धच आहे. जर पुरंदरला दिलीरचा वेढा ता. ३१ मार्चपर्यंत नव्हता, तर ता. ३० मार्चला मुरार बाजीचा मृत्यु कसा होणार ?

(२) श्रीयुत चांदोरकर आपल्या एका लेखांत म्हणतातः—ता. ३० मार्चल पुरंदरच्या माचीवरील लोकांनीं दिलीरखानाचा तळ उधळून लाविला. ता. ३१ मार्चला जयसिंगानें दिलीरखानास मदत पाठविली. शके १५८७ च्या वैशाखांत (१६६५ एप्रिल-मे) दिलीरखानानें पुरंदरास वेढा दिला. ता. १९ मे ला दाऊद पुरंदरास मुख्य सैन्यासह दाखल झाला.

(३) जेधे शकावलीः—शके १५८७ वैशाख मासीं जयसिंग व दिलेरखान येऊन पुरंदरास वेढा घातला. आषाढ शुद्ध १० राजश्री येऊन जयसिंगास भेटून सल्ला केला.


वरील तिन्ही लेखांवरून पाहतां पुरंदराला वेढा ३१ मार्च नंतर पडला व तो वैशाखांत पडला अशी एकवाक्यता होते. वैशाखांत मार्च महिना न येतां एप्रिल अखेर व मेचे कांहीं दिवस येतात. यावरून प्रो. सरकार यांनीं दिलेली माहिती अनुमानानें दिलेली असावी असें वाटतें.

दिलीरखान मार्चमध्यें तळ देऊन बसला होता तो त्यानें जूनमध्यें तह झाला तेव्हां उठविला. तळ दिल्यापासून उठेपर्यंत दोन महिने होतात. तेव्हां श्री. वाकसकरांनीं सभासदाचा आधार दिला आहे तो बरोबर आहे.

वरील माहितीवरून अनुमान निघतें तें:—दिलीरखान मार्चमध्यें पुरंदराजवळ तळ देऊन बसला. मराठ्यांवर अनेक हल्ले चढविले. किल्ल्याला वेढा घालून आंतील लोकांस हैराण करीत होता. मुरार बाजी व त्याचे लोक त्यास उलट जबाब देत होते, व आपला बचाव करीत होते. 'ता. १९ मे'ला दाऊद त्याच्या मदतीस आला तेव्हां दिलीरखानानें पुरंदरावर निकराचा हल्ला चढविला. तो दुसऱ्या दिवशीं असावा, आणि ह्या निकराच्या हल्ल्यांत मुरार बाजी मारला गेला हेंच अनुमान सिद्ध होतें.

मुरार बाजीचा मृत्युदिन चैत्र कृ. १० शके १५८७ हा श्री. वाकसकर यांनीं प्रो. सरकारच्या श्री शिवाजीच्या ३ ऱ्या आवृत्तीच्या पृ. १२० वरील आधारानें दिला आहे. पण प्रो. सरकार यांचें हें संशोधन अगदींच चुकीचें ठरतें, हें आम्हीं वर दिलेल्या हकीकतीवरून सिद्धच होतें. तसेंच "शिवापूर दप्तरांतील यादी" (शि. प्र. ५०) मध्यें पुढील हकीकत आहे:—"शके १५८७ विश्वावसु संवत्सरे चैत्र वद्य १० तांब्र पुरंधरास आले. वैशाख शु ॥ ११ रुद्रमाळ घेतली." जयसिंगानें रुद्रमाळ किल्ला घेतला तेव्हांच दिलेरला पुरंदरास वेढा घालून निकराचे हल्ले चढवितां आले हें प्रसिद्धच आहे. यावरून पाहतां मुरार बाजीचा मृत्युदिन ता. २० मे सन १६६५ आम्हीं निश्चित ठरविला. तो इ. सं. श्रीयुत आबा चांदोरकर व श्रीयुत यशवंतराव गुप्ते यांस मान्य आहे. आणि ऐतिहासिक पुरावा उपलब्ध होईपर्यंत तरी हाच मृत्युदिन खरा मानण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

# वंशावळ.





*संभाजी महाराजांचे कारकीर्दीत प्रसिद्ध होता; मृत्यु १७२२.

१

महादाजी बाजी (पोतनीस)

- अनंत (स्त्री नीराबाई नानी)
- बाजीराव
  - भगवंत
    - मल्हारी
  - प्रल्हाद
  - संभाजी
- यशवंत (खंडो बल्लाळचा जांवई)
  - विठ्ठल
    - भिवराव
      - मनोहर
        - भिवराव
          - जनार्दनराव
            - राजाराम (विद्यमान फर्स्टक्लास सरदार)
      - रामचंद्र
      - विठ्ठल
        - बाळकृष्ण
          - गोपिनाथ
          - दामोदर
    - भगवंतराव
    - यशवंत
    - बळवंत

REFBK-0003874


मुरार कान प्रभु २
दाद प्रभु
मुरार प्रभु
बाबाजी ऊर्फ बाजी प्रभु (उमराव)
मुरार बाजी (चरित्रनायक)
त्रिंबक बाजी
शंकराजी बाजी
संभाजी बाजी
महादाजी बाजी
१
राघो (स्त्री गिरजाबाई)
गंगाधर
विठ्ठल
शामजी
आत्माजी
केशव
दादाजी
निळकंठ
रघुनाथ
मुरार
दौलत
लाडको
व्यंकट
काशीराव
हणमंत
भास्कर

य. रा. गुप्ते, बी. ए., एम्. आर. ए. एस्. कृत

# दोन पुस्तकें.

## आमची परळीची यात्रा.

हें चित्ताकर्षक व हेमाडपंती देवळांची सुबोध रीतीनें माहिती करून देणारें पुस्तक आहे. यांत सुंदर छायाचित्रें ( पैकीं एक तंजावर येथील अस्सल प्रतीवरून घेतलेलें रामदास स्वामींचें ) असून वर्तमानपत्रें व मासिकांतून उत्कृष्ट अभिप्राय आलेले असून मुंबई सरकारनें प्राथमिक व दुय्यम शाळांतील शिक्षकांच्या पुस्तकालयांस मंजूर केलें आहे.

## कऱ्हाड.

आवृत्ति दुसरी.

महाराष्ट्रांतील एक अत्यंत प्राचीन शहर घेऊन त्याचा पुरातन काळापासून तों आजपर्यंतचा इतिहास देऊन लोकांत व विद्यार्थ्यांत पुराण–वस्तु–संशोधन व इतिहास–संशोधन यांची आवड उत्पन्न करावी या उद्देशानें वर निर्दिष्ट केलेलें पुस्तक लिहिलेलें आहे. याजवर नियत–कालिकें व वृत्तपत्रें यांतून उत्कृष्ट अभिप्राय आलेले आहेत. ही आवृत्ति बडोदें सरकारनें बक्षीसें व पुस्तकालयें यासाठीं मंजूर केलेली आहे. **किं. ८ आणे ट. ख. नि.**

य. रा. गुप्ते, बी. ए., एम्. आर. ए. एस्.

मु. खेड. ता. खेड. जि. पुणें.

**मागणीची त्वरा करा !** **पुढें मिळणार नाहीं ! !**

## उपयुक्त ऐतिहासिक साधनांचीं पुस्तकें.

पुस्तक १ लें.

**चिटणवीस घराण्याची संक्षिप्त माहिती व आज्ञापत्रें. किं. -।-**

पुस्तक २ रें.

**चिटणवीस घराण्याची संक्षिप्त माहिती व आज्ञापत्रें. किं. -॥-**

पुस्तक ३ रें.

**चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या प्रामण्याची माहिती व आज्ञापत्रें. किं. -।॥-**

पुस्तक ४ थें.

**मावळा सरदार विश्वासराव नानाजी देशपांडे.**

शिवकालीन स्वराज्य व स्वातंत्र्य संपादण्याकरितां जे वीर आत्मबलिदान करण्याकरितां सिद्ध झाले, त्यापैकीं एका वीराचें हें स्फूर्तिदायक चरित्र आहे. या चरित्रावर अनेक विद्वानांचे उत्कृष्ट अभिप्राय आलेले असून मुंबई इलाखा व मध्यप्रांत आणि वऱ्हाड येथील शिक्षणखात्यानें शाळांकरितां बक्षिसासाठीं व वाचनालयासाठीं मंजूर केलें आहे. किं. -॥-

पुस्तक ५ वें.

**वीर-रत्न बाजीप्रभु देशपांडे, याचें ऐतिहासिक चरित्र.**

यांत या वीराची साद्यंत हकीकत असल्यामुळें वाचतांना मन थराहून जातें. या स्फूर्तिदायक चरित्रावर अनेक विद्वानांचे उत्कृष्ट अभिप्राय आलेले असून, मुंबई इलाखा व मध्यप्रांत आणि वऱ्हाड येथील शिक्षणखात्यानें शाळांकरितां बक्षिसासाठीं व वाचनालयासाठीं मंजूर केलें आहे. किं. -।॥-

पुस्तक ६ वें.

**चित्रे-कुल वंशवृक्ष.**

यांत शांडिल्य गोत्राचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास असून बाळाजी आवजीच्या पूर्वीच्या साठ पिढ्यांपासून विद्यमान असलेल्या गृहस्थापर्यंतचा वंशवृक्ष दिलेला आहे. किं. -॥-

टीप—वरील पुस्तकांच्या प्रति थोडथोड्या शिल्लक आहेत. करितां मागणीची त्वरा करा ! सर्व पुस्तकांची एक एक प्रत एकदम मागविणारांसच फक्त व्ही. पी. टपाल खर्च माफ.

**बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी,**

कवळींची चाळ, कुंभारवाडा, दादर, मुंबई नं. १४.